# माणूस

२५ ऑक्टोबर १९६९

चाळीस पैसे

## एक रम्य बखर

### मी गंधर्व पाहिले

गंधर्व नाटकमंडळीचा मुक्काम मुंबईत असला की सॉलिसिटर लाडांच्या घरी एक रार्जबिंडे, रुबाबदार गृहस्थ येत. तासन्तास ते तिथे मग असत. त्या असण्यात मुळीही नाटक नसे. घरातली एक छोटीशी पण चाणाक्ष मुलगी तेव्हा त्यांना मुकाटयाने खूप न्याहाळीत राही. शोधकपणे, भक्तीने. त्या दिवसांची प्रथमच प्रकाशात येणारी रम्य बखर....

...विजय तेंडुलकर यांनी घेतलेली दुर्गा खोटे यांची एक दर्जेदार मुलाखत.

– माणूस दिवाळी अंक

### वर आभाळ बाकी बर्फ

'आज २९ मे. सकाळचे ५–५॥ वाजलेत. पण बाहेर चांगलेच उजाडले आहे. थंडी फार आहे. मी चहा पितो. आज आम्ही निघण्याच्या तयारीत आहोत. मी सर्व सामान तपासतो. होकायंत्र, नकाशा, पेन्सिली. आज आम्ही सहा जण आहोत. मी, माळी, लोपसांग, दोरजे, मीरवानसिंग व कुन्दन. बाकीचे आज विश्रान्ती घेतील. यापुढील प्रदेशात फार कोणी गेलेच नाही. १९५० ची स्कॉटिश तुकडी बहुधा शेवटचीच. आम्ही निघतो. All the best...इतर निरोप देतात '...

...हिमालयातील हनुमान शिखरावर यशस्वी चढाई करून आलेल्या तुकडीचे नेते आनन्द चांदेकर यांनी वाचकांशी केलेल्या मनमोकळ्या गप्पा.

– माणूस दिवाळी अंक

### संध्याकाळ

रामशास्त्री म्हणूनच मराठी प्रेक्षकांना ज्यांची लवकर ओळख पटते त्या गजानन जागिरदार यांच्या चाळीस वर्षांच्या चित्रपट-जीवनातील वाटचालीचे त्यांनीच केलेले कथन.

– माणूस दिवाळी अंक

# माणूस दिवाळी अंकाची इतर आकर्षणे

☘ ☘ ☘ ☘ ☘ ☘

गंगाधर गाडगीळ, मधू मंगेश कर्णिक, द. मा. मिरासदार, आनंद यादव, रंगा मराठे यांच्या वेधक कथा.

'श्यामा' कादंबरी – एक श्लील खटला आणि त्यातील काही ढंगदार अनुभव – मधुकर परांजपे

ग्यानबा, सुधाकर राजे यांचे 'मुक्ताफळे' 'भितीच्या तुंबड्या' या गाजलेल्या सदरांची आठवण करून देणारे खमंग साहित्य.

सूर्यकांत, श्रीकांत मोघे या आघाडीवरील चित्रपट कलावंतांची मनमोकळी आत्मकथने.

बंगलोरनंतर भारतात घडत गेलेल्या राजकीय नाट्याची प्रा. य. दि. फडकेकृत परखड मीमांसा.

☘ ☘ ☘ ☘ ☘ ☘

- या दिवाळी अंकाची किंमत रुपये साडेतीन
- पृष्ठसंख्या १७५ ते २०० : आकार नेहमीच्या माणूसच्या दुप्पट मोठा.
- प्रसिद्धी : दिनांक १ ते ५ नोव्हेंबर १९६९
- या दिवाळी अंकानंतरचे दिनांक ८, १५, २२, २९ नोव्हेंबरचे माणसचे चार अंक बंद राहतील.
- दिनांक ६ डिसेंबरपासून नेहमीच्या दिवशी, नेहमीच्या स्वरूपात माणसचे नित्य प्रकाशन सुरू होईल. विक्रेत्यांनी व वाचकांनी कृपया याची नोंद घ्यावी.

२५ ऑक्टोबर १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक एकविसावा

संपादक : **श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९


किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

आत्ताच्या ताज्या माणूसमधील ग. दि. मा. वरील द. मा. मि चा लेख वाचला. मजा आला. लेख उत्कृष्ट आहे. ग. दि मा. हे आजच्या मराठी चित्रपट आणि काव्य सृष्टीतील एक चमत्कार आहेत. त्यांच्या तोंडातून किंवा प्रतिभेतून काव्य स्रवत नाही तर त्यांचे रक्त हीच एक काव्यगंगा आहे. मिरासदार यांनी त्यांच्या काव्याला पारिजातकांच्या फुलांची उपमा दिली आहे. ही उपमा गदिमांच्या काव्यप्रक्रियेला समर्पक आहे. पण त्यांच्या काव्यगुणाचा विचार केला तर 'चारुते लीनते सीते' सारखे अतिशय नाजुक आणि हळुवार भावनेने ओथंबलेले गीत वेलीसारखे नजरेसमोर लोंबत राहते, तर दुसरीकडे, 'अजन्मा जन्मासी आला' या गीतगोपाळमधील गीताने, त्यातील शब्दयोजनेतील चातुर्य आणि चपखलपणा पाहून मन थक्क होते; तसेच राकट प्रेमाची आतषबाजी करणाऱ्या त्यांच्या लावण्या आणि 'चवदा भाषा गर्जत उठल्या'सारखी देशभक्तिपर गीते वाचून गदिमांच्या अचाट प्रतिभासामर्थ्यापुढे रसिक मन नम्र होते.

या मराठी शाहिरास माणूसच्या मुखपृष्ठावर पाहून हजारो रसिक वाचक तुमची पाठ थोपटतील. त्यात हाही एक ओला दोस्तीचा हात.

**१७ ऑक्टोबर** **वि. शं. पारगावकर.**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक १४ ऑक्टोबर

### दुसऱ्या फेरीची तयारी

अपेक्षेप्रमाणे चौथ्या भारतीय युद्धाची दुसरी फेरी सुरू होण्याच्या बेतात असून दोन्हीकडील रथी-महारथी शंखं दघ्मौ पृथक् पृथक्. मंडळी निमित्ताला टेकलेलीच होती. त्यांना सुब्रह्मण्यम् प्रकरणाचे निमित्त मिळाले आहे. सुब्रह्मण्यम् यांनी तामीळनाडू प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या राजीनामा दिल्यावर आता ते काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सभासद राहिले आहेत की नाही या पक्ष-प्रश्नावर आता रण माजणार आहे. त्या निमित्ताने पुनश्च गरमागरम पत्रापत्री झाली. एकीकडे निजलिंगप्पा म्हणत आहेत की मी सुब्रह्मण्यम्ची हकालपट्टी केलेली नाही, उलट ३० ऑक्टोबरच्या कार्यकारिणीच्या बैठकीला त्यांना बोलावणे पाठविले आहे. उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष कमलापती त्रिपाठी व वेंकटरत्नम् यांना त्यांनी 'मंत्री रहा नाही तर काँग्रेस अध्यक्ष रहा' असा आदेश पाठविला आहे। पण तो मागे काँग्रेसनेच केलेल्या प्रस्तावानुसार पाठविला आहे. एकाच माणसाने मंत्रीपद व पक्षप्रमुखपद अशा दोन्ही टोप्या एकाच वेळी घालू नये असा दंडक काँग्रेसनेच घालून दिला नाही काय ?

उलट इंदिरा-गोटाची फिर्याद अशी आहे की अप्पांनी सुब्रह्मण्यम्ची हकालपट्टी करण्याचे ठरवले होते. तशा पत्रावर सहीदेखील केली होती; पण इंदिराजी, यशवंतराव वगैरे मंडळींनी संयुक्त निषेध-पत्र पाठविल्याने हकालपट्टीचे पत्र प्रत्यक्ष पाठविण्यात आले नाही इतकेच. गंमत म्हणजे पूर्वी इंदिराजींनी मोरारजींना डच्चू देताना जे तंत्र वापरले ते प्रतिपक्षीयांना सुचले नव्हते, तर आता अप्पाजी सुब्रह्मण्यम् इत्यादींचा काटा काढण्यासाठी जे तंत्र वापरीत आहेत ते बरोबर नाही असा इंदिरा-स्नेह संवर्धक समाज त्यांच्यावर आरोप करीत आहे. म्हणजे एका परीने दोन दिवस सुनेचे तर दोन दिवस सासूचे असा उलटा प्रकार झाला. अप्पाजी एकीकडे म्हणत आहेत की ते काही नाही, घटना म्हणजे घटना, पण दुसरीकडे त्यांचे पक्षपाती आणखी एक शस्त्र उपसण्याच्या तयारीतही आहेत. हे शरसंधान

आर्थिक स्वरूपाचे आहे. अप्पा अँड को बँक राष्ट्रीयीकरणाची तळी तर उचलून धरणार आहेतच, पण इतरही अशीच क्रांतिकारक कार्यवाही व्हावी असा आग्रह धरणार आहे. उदाहरणार्थ, महाराजांचे तनखे बंद करणे. आंतर: कोपि हेतु असा की पार्लमेंट-सदस्य असलेल्या महाराजांच्या पाठिंब्याला इंदिराजी पारख्या व्हाव्यात.

इंदिराजी काल लखदोवहून परतल्या तेव्हा त्यांनी विमानातच बरोबरच्या पत्रकारांना सांगितले की काँग्रेसमध्ये काही नवीन समरप्रसंग उद्‌भवलेला नाही; पण बाईंनी असा पदर झटकला असला तरी दोन्ही बाजू मुकाबल्याच्या ईर्षेने शस्त्रसज्ज होत आहेत हे उघड आहे. आपापल्या भूमिकेला पोषक असे जुने कागद-पत्र व प्रस्ताव-पुरावे शोधून काढण्याचा उद्योग सध्या दोन्ही बाजूंनी आरंभलेला आहे व आपलाच पुरावा सज्जड आहे अशी दोन्ही बाजूंची खात्री आहे. दरम्यान टीटीकेंनी सुब्रह्मण्यम्-प्रकरणी कृष्णशिष्टाई करण्याची ऑफर केली आहे. पण ३० तारखेच्या आंत दिलजमाई होणे शक्य दिसत नाही, तेव्हा कार्यकारिणीच्या बैठकीत फटाके वाजल्यास नवल नाही. पण त्या बैठकीत नुसतीच नमनाची झटापट झाली तर आय्. सी. सी. चे रणांगण आहेच. ए. आय्. सी. सी. मध्ये अप्पांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून थेट बालेकिल्लाच सर करायचा इंदिरा-गटाचा मनसुबा आहे अशीही किंवदन्ती आहे. पण आपण स्वत: होऊन मात्र राजीनामा देणार नाही असा निर्धार अप्पांनी परवा राजधानीत पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. "दिसेल त्या काठीने मला झोडपावे असा प्रकार चालला आहे व माझी नालस्ती करणे हा एक किफायतशीर व्यवसाय होऊन बसला आहे."—इति अप्पा-विलाप. या सर्व प्रकरणांत एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे यशवंतरावांना अखेर 'इन् द पाँड, ऑन् द बँक' या खेळाचा कंटाळा आलेला दिसतो. मध्यस्थाचा मार्ग सोडून ते अखेर इंदिराजींच्या पदरी पडून पवित्र झाले आहेत.

## सरकारी अन्यायालयात मधोक

अहमदाबादच्या दंग्याचा सध्या देशभर जाहीर पंचनामा चालू आहे. तो संपायच्या आतच बलराज मधोकांवर जातीय वैमनस्य वाढविणारी भाषणे करण्याच्या आरोपावरून फिर्याद करण्याचे ठरवून सरकारने बुडत्या सेक्युलरवादाला जन-संघाच्या काडीचा आधार घेतला आहे. ही फिर्याद तांत्रिकदृष्टया दिल्ली प्रशा-सनाने दाखल केली असली तरी ती केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशानुसार दाखल झाली आहे हे स्वत: यशवंतरावांनी कबूल केल्याचे कळते. तसे पाहिले तर दिल्ली-वर जनसंघाचे राज्य आहे व जनसंघीय नेत्यांनी, मधोकांवर खटला भरण्याचे काहीच प्रयोजन नाही असे स्पष्ट बोलून दाखविले आहे. पण 'लॉ अँड ऑर्डर' हा केंद्रीय प्रांत असल्याने खटला आपल्या नावाने भरण्यात आला असला तरी भरविता धनी वेगळाची, असे सांगून दिल्लीचे लेपटनंट गव्हर्नर झा यांनी आपली

असहायता प्रकट केली आहे. पण हा खटला दिल्ली प्रशासनाने स्वत:च्या अक्कल-हुशारीने भरला की गृहमंत्रालयाच्या इशाऱ्यानुसार भरला हा जनसंघीय नेत्यांच्या मते मुख्य मुद्दा नाही. मुख्य मुद्दा आहे तो 'जनसंघाला बदनाम करण्यासाठी सरकार जे पक्षपाती तंत्र अवलंबित आहे त्या तंत्राचा.' अशा पक्षपातापुढे नमायचे नाही अशा निर्धाराने जनसंघाने प्रस्तुत प्रकरणी सरकारच्या शह्याला प्रतिशह देण्याची तयारी चालविली आहे.

सरकारच्या पक्षपाती धोरणामुळे खरोखरीच कडक भाषणे करणारी मंडळी सहीसलामत सोडली जातात याचा पुरावा म्हणून दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळी एका केंद्रीय मंत्र्याने केलेली भाषणे गोळा करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे शेख अब्दुल्लाने दिल्लीत केलेली भाषणे व ज्योती बसूंची भाषणे उद्धृत करून या भाषणांनी कायद्याचे उल्लंघन होत नाही काय असा जनसंघ सरकारला सवाल करणार आहे.

ज्या अहमदाबादच्या हत्याकांडाचा गैरफायदा घेऊन मधोकांवर खटला भरण्यात आला आहे ते कांड वास्तविक पाकिस्तान्यांनी घडवून आणलें आहे अशी जयप्रकाश नारायण यांनी परवा दिल्लीत माहिती दिली. हे असे प्रकार घडवून आणून आपल्याच धर्मबांधवांचे बळी द्यायचे व मग त्याच्या बळावर पुन: एकदा भारताच्या फाळणीची मागणी करायची असे कारस्थान पाकिस्तानात शिजत असल्याचे त्यांनी जाहीर विधान केले आहे. तेव्हा जनसंघाशी सहमत नसणाऱ्या मंडळींच्या मतेही मधोकांवरचा खटला म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचा प्रकार होणार आहे.

## वर्गणीदारांस सूचना

आमचे कार्यालयाकडे वर्गणी भरलेल्या सर्वच वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी आमचेकडे ९० पैसे पाठवावेत.

अंक मोजून व्यवस्थित पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमचेकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठव.

ज्यांची वर्गणी १ नोव्हेंबर ६९ पूर्वी संपत असेल त्यांनी वार्षिक वर्गणी लगेच रवाना करावी. म्हणजे त्यांना दिवाळी अंक देता येईल.

व्यवस्थापक साप्ताहिक माणूस

## अनिष्ट संभावना

शेख अब्दुल्लांनी गफारखानांची भेट मागितल्याचे कळले तेव्हाच गफारखान मुसलमान आहेत या एकाच गोष्टीचा अब्दुल्ला येनकेन प्रकारेण दुरुपयोग करून घेणार की काय अशी शंका मनाला चाटून गेली होती. ही शंका अगदीच खोटी ठरलेली नाही. अब्दुल्ला गफारखानांना आतापर्यंत दोनदा भेटले व आणखी एकदा भेटणार आहेत. पहिली भेट कड्या-कुलपे लावून झाली तर दुसऱ्या भेटीत दोघांच्या अब्दुल्लांची कुविख्यात मैत्रीण मृदुला साराभाई यांच्या घरी खाना घेतला तेव्हा ऐसपैस गप्पा झाल्या. या भेटीत म्हणे काश्मीरसकट सर्व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समस्यांची चर्चा झाली.

अब्दुल्लांना गफार-भेटीने विशेष आनंद होण्याचे कारण म्हणजे गफारखानांची आदल्या दिवशीची पत्रकार-परिषद. येथल्या प्रेसक्लबमध्ये झालेल्या प्रश्नोत्तरीत त्यांनी असे विधान केले की काश्मीरी जनतेला जे वचन देण्यात आले असेल ते पाळण्यात आले पाहिजे. भारतात सामील होण्याचा करार महाराजा व अब्दुल्ला या दोघांच्या संमतीने झाला होता तो या वचनात मोडत असेल तर त्याचे पालन झाले पाहिजे.—पण त्या कराराच्या वेळी स्वयनिर्णयाचे वचन देण्यात आले असेल तर तेही पाळण्यात आले पाहिजे. एक महत्त्वाचा प्रश्न: तुम्हाला पाकिस्तानातच स्वायत्त पख्तूनिस्थान हवे आहे तसेच भारतात काश्मीरचे स्थान असावे काय? उत्तर: ते काश्मीर जनतेला विचारून त्यांच्या संमतीने ठरवा. अर्थात अब्दुल्ला या उत्तरांनी खूष झाले आहेत हे सुज्ञास सांगणे नलगे. प्लेबिसाइट फ्रंट या पाकिस्तानी गटानेही गफारखानांच्या विधानाचे स्वागत केले आहे. म्हणजे आपला देशद्रोह बिल्ल्याप्रमाणे मिरविणाऱ्या अब्दुल्लांच्या मनसुब्यांना गफारखानांनी अभावितपणे का होईना, नवीन चेतनाच दिली असे म्हटले पाहिजे.

—अनामिक

### देणार काँग्रेस चित्रपट ?

गेल्या आठवड्यात अप्पा-इंदिरा पत्रापत्रीचे दुसरे पर्व गाजले त्या सुमारास नव्या दिल्लीत जंतरमंतर रोडवरील कांग्रेस कार्यालयाच्या बाहेर 'बॅटल् ऑफ द बल्ज' या चित्रपटाची जाहिरात लागली होती. कोणी तरी 'बल्ज' हा शब्द खोडून सुधारणा केली होती 'बॅटल् ऑफ द लेटर्स!'



# नरुभाऊ लिमये

## जितके फटकळ तितकेच शालीन जविन

वि. स. वाळिंबे

नरुभाऊंच्या सार्वजनिक कार्याचा आजही झपाटा एवढा आहे की त्यांच्या उत्साहाकडे आणि धावपळीकडे पाहिल्यानंतर या गृहस्थाने वयाची साठी गाठलेली आहे याचा विश्वास वाटू नये. 'सगुण धामा'तील त्यांच्या निवासस्थानी केव्हाही या, नरुभाऊंचे सरकारदरबारी वजन आहे हे माहीत असलेला कोणी ना कोणी गृहस्थ आपले गाऱ्हाणे घेऊन त्यांच्याकडे आलेला असतो. त्याने आणलेले कागदपत्र पाहून नरुभाऊ त्या गाऱ्हाण्याची टिपणे करीत असतात आणि हे गाऱ्हाणे अस्सल आहे अशी खात्री पटली की नरुभाऊंमधला सार्वजनिक कार्यकर्ता जागा होतो. भेटावयास आलेल्या माणसाला सांगतात, "मी उद्या मुंबईला जाणार आहे. संबंधीत अधिकाऱ्याची गाठ घेऊन तो काय म्हणतो ते मी पाहतो. परवा सकाळी भेटायला या."

एखाद्या वेळी त्यांना कोणीच भेटायला आलेले नसते. त्या वेळी त्यांचे एकतर टाईम किंवा गार्डियनचे वाचन तरी चाललेले असते किंवा टेबलासमोर बसून ते आपले लिखाण तरी उरकत असतात. परदेशी घडामोडींबाबत लिहिणे हा नरुभाऊंचा

**येत्या ६ नोव्हेंबरला नरुभाऊ एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत.**

आवडता छंद आहे. तीस बत्तीस वर्षापूर्वी नरुभाऊंनी प्रथम स्पेनमधील यादवी युद्धाबद्दल लिहिले आणि त्यानंतर ते सतत लिहित आलेले आहेत. आग्नेय आशियातील राजकारणासंबंधीचे 'लाल लाल पूर्व' हे त्यांचे पुस्तक याच आवडीतून जन्माला आलेले आहे. सार्वजनिक कार्याइतकीच नरुभाऊंना लेखनाची आवड आहे. त्यामुळे ते नेहमी म्हणत असतात, "आज मी आमदार आहे; पण हे पद केव्हा जाईल ते मला माहीत नाही. मी पत्रकार मात्र कायमचा आहे."

नरुभाऊंचा पत्रव्यवसायाशी संबंध आला त्यालाही आता तीस वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. साताऱ्याच्या समर्थ साप्ताहिकात त्यांनी आपल्या लेखनाला प्रारंभ केला. पुढे ते त्या पत्राचे संपादक झाले. कालांतराने साप्ताहिकाचे क्षेत्र त्यांना अपुरे वाटू लागले आणि १९४८ मध्ये 'प्रकाश' हे दैनिक त्यांनी सुरू केले. त्याकाळी जिल्हा दैनिकाची आर्थिक स्थिती फारशी समाधानकारक नसे. तरीही तोटा सोसून नरुभाऊंनी हे दैनिक चालू ठेवले. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्र प्रदेश कांग्रेसचे प्रचारप्रमुख ही जबाबदारी नरुभाऊंकडे आली व त्यामुळे त्यांचा कै. भाऊसाहेब हिरे यांच्याशी दृढ परिचय झाला. या परिचयामुळे कै. भाऊसाहेब हिरे यांनी पुण्यातील 'लोकशक्ति' या दैनिकाची जबाबदारी नरुभाऊंकडे सोपवली. तेव्हापासून नरुभाऊंचे सातारा सुटले आणि ते पुण्याला स्थायिक झाले. तरीही साताऱ्यातील अनेक संस्थांशी त्यांचा जो जिव्हाळ्याचा संबंध होता तो त्यांनी कधीही कमी होऊ दिला नाही. आठवड्यातील एक दिवस त्यांनी साताऱ्यासाठी राखून ठेवला आहे

नरुभाऊंनी जेव्हा लोकशक्तीची जबाबदारी स्वीकारली तेव्हा ते पत्र डबघाईला आलेले होते. आर्थिक विवंचनेचा बोजा डोक्यावर घेऊन संपादकीय कामकाज पाहणे म्हणजे वैतागच होता. परंतु त्यामुळे नरुभाऊ कधी संतापलेले किंवा सहकाऱ्यांवर चिडलेले दिसले नाहीत याचा अनुभव मी घेतलेला आहे. उलट पत्राच्या ओढगस्त स्थितीमुळे आपल्या सहकाऱ्यांचाही आर्थिक कोंडमारा होत आहे या जाणीवेने ते बेचैन असायचे. या संदर्भात एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. दोन एक महिने पगार न मिळाल्यामुळ त्रासलेल्या एका कारकुनाने जाहिरातींच्या बिलाचे पैसे वसूल करून ते वापरले. काही महिन्यांनी ही गोष्ट व्यवस्थापकांच्या लक्षात येताच त्यांनी नरुभाऊंना हा प्रकार सांगितला आणि त्या कारकुनाला कोणती शिक्षा करायची अशी विचारणा केली. त्या कारकुनाला ताबडतोब बडतर्फ करा असेच आपल्याला नरुभाऊ सांगतील अशी व्यवस्थापकांची कल्पना होती. परंतु नरुभाऊ व्यवस्थापकांना शांत चित्ताने म्हणाले, "आपण त्याचे पैसे देणे आहोत ना? मग त्याने वसूल केलेले पैसे त्याच्या नावावर जमा करा."

लोकशक्तीतील काही कर्मचाऱ्यांनी बऱ्याच दिवसांचा पगार थकल्यामुळे नरुभाऊंना नोटिसा दिल्या. त्यामुळे नरुभाऊंना आर्थिक तापापेक्षा मानसिक ताप अधिक

झाला. तरीही त्यांनी या घटनेबद्दलचा मनातील सारा कडवटपणा विसरून त्या कर्मचाऱ्यांना दुसरीकडे नोकऱ्या मिळविण्याची आपण होऊन खटपट केली. मनाचा हा मोठेपणा नरुभाऊंना कसा प्राप्त झाला याचे कारण शोधणे फारसे अवघड नाही. लहानपणी झालेल्या संस्कारांचा हा वारसा असल्याचे नरुभाऊही विनम्र भावाने सांगतात.

'पातंजल योग दर्शन' या विद्वन्मान्य ग्रंथाचे लेखक श्री. बाबासाहेब कोल्हटकर हे नरुभाऊंचे मामा. नरुभाऊंचे बालपण बाबासाहेबांच्या घरी व्यतीत झाले. त्यामुळे साहजिकच योगसाधक राहतो कसा, बोलता कसा हे नरुभाऊंना अनायासे पाहता आले. दुसऱ्यांच्या भल्यासाठी निष्काम मनाने जीवन व्यतीत करणाऱ्या बाबासाहेबांसारख्या साधुतुल्य व्यक्तीने नरुभाऊंचे बालपण घडविले तर किशोरवयात त्यांना श्री. दत्तोपंत परांजप्यांसारखे आदर्श शिक्षक लाभले. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय अभ्यास करून घेतला की आपले काम संपले असे दत्तोपंतांनी कधीच मानले नाही. विद्यार्थ्यांची जीवने घडविणाऱ्या या शिल्पकाराने आपल्या अनेक शिष्यांना जनसेवेची प्रेरणा दिली. नरुभाऊ त्यातलेच एक उल्लेखनीय शिष्यवर. नुकताच साताऱ्याला श्री. दत्तोपंत परांजपे यांचा अमृत महोत्सव साजरा झाला. त्याप्रसंगी बोलताना नरुभाऊ म्हणाले, "शाळेत प्रथम पाऊल टाकणारा विद्यार्थी दगडासारखा कोरा असतो. त्याच्यावर संस्कारांची जशी छिन्नी चालवावी तसा तो आकार घेतो. या दगडातून देवाच्या मूर्ती बनविण्याचा दत्तोपंतांचा ध्यास होता. आपली पिढी लोकसेवेचे थोडेफार कार्य करू शकली याचे सारे श्रेय दत्तोपंतांच्या परिश्रमांना आहे."

दत्तोपंतांच्या प्रेरणेमुळेच शालेय जीवनात नरुभाऊ बॉय स्काउट चळवळीकडे आकर्षित झाले. सार्वजनिक जीवनात वागताना आपले राग-लोभ कसे बाजूला ठेवावे लागतात, इतरांचे मानपान सांभाळण्यासाठी आपणच आपली उपेक्षा कशी करून घ्यायची यांचे बारकावे प्रसंगोपात्त दत्तोपंतांनी नरुभाऊंना समजावून सांगितले. आणि त्याचा नरुभाऊंना पुढच्या आयुष्यात बराच उपयोग झाला. शालेय शिक्षण आटोपल्यानंतर नरुभाऊ काँग्रेसचे कार्य करू लागले. व्यक्तीने एकदा राजकारणात रस घ्यायला सुरुवात केली की आपोआपच त्याच्यासंबंधी गैरसमजाचे वातावरण निर्माण होते. यावेळी सावध वृत्तीचा कार्यकर्ता या गैरसमजांना अवास्तव महत्त्व न देता आपल्या कार्यातच दंग राहतो. त्यामुळे काही वेळा त्याच्यावर अन्यायही घडतो; पण त्याला त्याचा फारसा विषाद वाटत नाही. नरुभाऊंनी सार्वजनिक जीवनात वावरताना हे सूत्र आपल्या मनाशी पक्के बांधून ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला नाही असे नव्हे; पण तरीही नरुभाऊंच्या स्वभावात कटुता येऊ शकली नाही. नरुभाऊंची ही साधना सध्याच्या सत्तालोलुप राजकारणाच्या काळात मला विशेष महत्त्वाची वाटते. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर असे म्हणता येईल की साताऱ्यातील त्यांचे पंधरा वर्षांचे राजकीय कार्य लक्षात घेता महाराष्ट्र काँग्रेसने त्यांना १९५२ सालीच विधानसभेचे तिकिट

द्यायला हवे होते. पण ते मिळाले नाही तरी नरुभाऊ काँग्रेसच्या कार्यापासून दूर झाले नाहीत. महाराष्ट्र काँग्रेसने प्रचारप्रमुखाची जबाबदारी सोपविली तीही त्यांनी आनंदाने पार पाडली.

नरुभाऊंचा विधानसभा-प्रवेश अगदी अलीकडे म्हणजे त्यांचे कार्य लक्षात घेता बऱ्याच उशीरा झाला असेच म्हटले पाहिजे. त्याला नरुभाऊंचा स्पष्टवक्तेपणाही काही प्रमाणात कारणीभूत झाला असावा. श्री. यशवंतराव चव्हाण हे नरुभाऊंचे बऱ्याच दिवसापासूनचे स्नेही. तरीही श्री. चव्हाण यांनी द्विभाषिक मुंबई राज्याचा पुरस्कार सुरू केला तेव्हा 'श्री. चव्हाण यांचे हे मत आपल्याला मान्य नाही' असे नरुभाऊंनी जाहीररीत्या सांगितले. इतकेच नव्हे तर लोकशक्ति हे काँग्रेस पक्षाचे मुखपत्र असूनही महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या धोरणाशी आपले जे मतभेद आहेत त्याचा लोकशक्तीच्या स्तंभातून उच्चार करताना नरुभाऊ कधी बिचकले नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी तडजोड म्हणून डांगवर उदक सोडण्याची जेव्हा महाराष्ट्राच्या काँग्रेस नेत्यांनी तयारी दर्शविली तेव्हा 'डांगला टांग मारू नका' असे परखडपणे बजावणाऱ्या नरुभाऊंच्या बाबतीत सत्ता वाटपाच्या वेळी पंक्तिप्रपंच होत गेला यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. अर्थात् ही त्यांच्या स्नेह्यांना जाणवणारी व्यथा आहे. स्वतः नरुभाऊंनी त्याची कधी फिकीर केली आहे किंवा त्यासंबंधी कोणाजवळ त्रागा व्यक्त केला आहे असे घडलेले नाही.

त्यांच्याशी गप्पा मारताना असले खारटतुरट विषय फारसे येत नाहीत. याचेही हेच कारण असावे. आपल्यावर सोपविलेले काम नीट पार पाडण्याचा आपल्याकडून प्रयत्न करायचा, बाकीच्या तत्संबंधित घटनांपासून अलिप्त रहायचे अशीच नरुभाऊंनी आपल्या मनाला शिस्त लावून घेतलेली आहे. बऱ्याच दिवसांनी परवा नरुभाऊंकडे गप्पा मारायला गेलो होतो. त्यावेळीही नवीन काय वाचले, काय लिहिले याचीच ते माहिती देत होते. नंतर लोकशक्तीच्या काळातल्या आठवणी निघाल्या. कोण कोठे आहे, केव्हा भेटला याची उजळणी झाली. नवीन काय लिहायचे आहे याचे संकल्प सांगितले गेले. अनेकविध विषय गप्पांच्या ओघात येऊन गेले.

निरोप घेताना मी त्यांना म्हटले, "भाऊ, सतरा वर्षांपूर्वी लोकशक्तीची जबाबदारी स्वीकारताना तुम्ही जेवढे उत्साही होता तेवढेच आजही उत्साही आहात हे पाहून मला आश्चर्य वाटतं."

ते नुसते हसले. पण मी म्हटले त्यात काहीही अतिशयोक्ती नव्हती. कारण साप्ताहिक काढायचा विचार त्यांच्या मनात सध्या घोळत आहे हे मला माहित आहे.

कागद, शाई, 'कॉप्या' आणि मुद्रणयंत्राची धडधड यांच्या संगतीवाचून नरुभाऊंना कधीही करमले नाही. आजदेखील करमत नाही.

□ □ □

डॉ. अनिल अवचट

# पुणे ते पूर्णिया

लेखांक तीन । चार । पाच

रघुवंश नारायण हा जातीने रजपूत. उंचापुरा, भल्यामोठ्या पांढऱ्या मिशा, समोरच्या माणसावर काहीही न बोलता वचक बसविणारी धारदार नजर. भलामोठा नेहरुशर्ट, खाली धोतर, गळ्यात दोन्ही बाजूंनी खालपर्यंत आलेले उपरणे. काखेत एकादे पुस्तक.

अशी मूर्ती लोकांना त्यांच्या जुन्या कोठीसमोरच्या नदीकाठच्या 'चौडी'मध्ये बसलेली दिसते. चावडी म्हणजे एक ओटा, त्यावर चार खांब, त्यावर एक छप्पर. येथे बसून सर्व सूत्रे हलतात.

रघुवंशबाबू उदार म्हणून प्रसिद्ध. वर्षाकाठी काही उत्सवानिमित्त जेवणावळी होतात. पंचक्रोशातली गावे जेवून जातात. केवढी उदारता, केवढा मोठा माणूस असे सर्वजण म्हणतात.

रघुवशबाबू कॉंग्रेसचे आश्रयदाते. चव्हाण आले की त्यांच्याकडे उतरतात. नेहरूंशी घनिष्ठ मैत्री होती. त्यांचे थोरले चिरंजीव एम्. पी. होते. सध्या धाकटे चिरंजीव बिहारचे एम्. एल्. सी. आणि बिहार स्टेट ट्रान्सपोर्टचे डायरेक्टर आहेत.

पण रघुवंशबाबू इतर पक्षांच्या बाबतीतसुद्धा भेदभाव दाखवीत नाहीत. सर्व पक्षांना मदत करतात. अगदी कम्युनिस्ट पक्षाच्या अधिवेशनाला देखील पैसे देतात. कोणीही पक्षवाला कोणत्याही कामासाठी गेला तरी त्याला हजार रुपये दिल्याशिवाय परत पाठवीत नाहीत. केवढे औदार्य हे! आणि तरीसुद्धा लोक त्यांना नावे ठेवतात.

त्यांच्या विरुद्ध लढणाऱ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांवर तर त्यांचा विशेष लोभ.

त्यांना ते घरी बोलावतात. खाऊपिऊ घालतात. अडीअडचणीला गरजेपेक्षा अधिक-सुद्धा पैसे देतात. नाहीतर यांचे हाल कोण पुसणार ?

सर्वोदयाची हाक आली. रघुवंशबाबू सर्वांच्या पुढे. जयप्रकाश आल्यावर उतरतात कोठीवरच. आता भूदान केल्यावर त्या गरीब लोकांना जमीनी कसण्याचा त्रास पडू नये म्हणून रघुवंशबाबूंना त्यांच्या परत जमिनी घ्याव्या लागतात यात त्यांचे काय चुकले ?

मला एक कार्यकर्ते सांगत होते. ते एकदा रघुवंशबाबूंकडे गेले होते. रघुवंश-बाबूंनी चक्क सांगितले, "समजा रात्री तुमच्या संसोपाचे सरकार आले, तर सकाळी माझ्या डोक्यावर तुम्हाला ससोपाची लाल टोपी दिसेल. आखिर क्या, हम तो 'सरकारपदस्थ' आदमी है।"

आता यावर काय बोलायचे आणि लिहायचे ?

माझ्याशी बोलताना जीवेश्वरबाबू म्हणत होते, आमचे राजासाब 'प्रजे'ला लेकरासमान मानतात. मी म्हणालो, बरोबर आहे. मग लेकराचा हट्ट ते का पुरवीत नाहीत ? त्यावर ते म्हणाले, "य कैसे हो सकता है। ये तो विषमता का प्राब्लेम है। वो तो बहूत विशाल प्राब्लेम है, पूरे देसका प्राब्लेम है। हम लोक अकेले कैसे हल करेंगे ?"

मला या माणसांची गंमत वाटली. कितीही प्रचंड अन्याय करणारा असो, तो आपापले स्पष्टीकरण शोधून काढीत असतो. आपल्याकडे कामगारांना 'गरजे पुरते दाम' नाकारणारे कारखानदारही 'आम्ही खऱ्या अर्थाने समाजसेवक आहोत, आम्ही अमुक हजार लोकांना काम पुरविले' अशी फुशारकी मारतात. धान्य गोठवणारे, मालाची भरमसाठ भाववाढ करणारे दलाल, 'आम्ही समाजाला धान्य-पुरवठा करून समाजसेवा करीत आहोत' याचे श्रेय घेतात. त्यातलाच हा प्रकार आहे.

सर्वांपुढे प्रश्न पडेल ही एवढी जमीनदारी आली कोठून ? समजणे सोपे आहे. नवाबी सल्तनतीत छोटे मोठे राजे तर होतेच. पण त्याचे विशेष नाही. इंग्रज येथे आले. ते कलकत्त्यात स्थिरावले. बगाल इलाका म्हणजे ओरिसा, बिहार, बंगाल व आसाम मिळून बनलेला. इंग्रजांनी रयतेकडून खंडणी वसूल करण्यासाठी निर-निराळया लोकांमध्ये विभाग वाटून दिले. तुम्ही अमुक जिल्ह्याचे इतके लाख रुपये आम्हाला आणून द्या म्हणजे झाले. प्रत्यक्षात तुम्ही कितीही वसूली केली तरी त्यात आम्ही ढवळाढवळ करणार नाही असे त्यांना सांगितले गेले. या माणसांनी त्यात आणखी भाग पाडून आणखी काही लोकांना वसुलीचे कॉन्ट्रॅक्ट दिले. अशा-तऱ्हेने सरकार व कूळ यांच्यात हे 'Middle men' निर्माण झाले. यांनी भरम-साठ सारे लादून, खंडण्या जमा करून स्वतःच्या जायदादी वाढवल्या. वरच्या माणसाम त्याचा वाटा दिला म्हणजे त्याची काही तक्रार नसे.

ते हे जमीनदार. वरची राजवट गली. त्यानंतरची संस्थानांची सुद्धा रँक खतम झाली. आता हेच कायदेशीर जमीन-मालक ठरले. कांग्रेसमध्ये शिरून सरकारही यांनी हातात ठेवल्याने जमीनदारी नष्ट करण्याचा प्रश्नच उरला नाही. अजून बिहारच्या जमीनींचा सर्व्हे होऊ शकला नाही. चार वर्षांपूर्वी दोन-तीन जिल्ह्यांचा सर्व्हे झाला; पण अजून तो प्रकाशित होऊ शकला नाही. सीलींगच्या कायद्याची अंमलबजावणीच होऊ शकत नाही.

म्हणून आपण जेव्हा तिकडच्या जमीनदारीची हकीकत ऐकतो, तेव्हा आपण सहज बोलून जातो, मग जमीनदारी खतम का करून टाकत नाहीत? ते वाटते तितके सोपे नाही. त्यात राजकीय जसे अडथळे आहेत तसेच कायद्याचे पण आहेत. सांस्कृतिक वर्चस्वाचे आहेत. उच्च जातींचे आहेत.

मी डाक बंगल्यात आल्यावर एसेमनी मला उत्सुकतेने विचारले, काय म्हणत होते जमीनदार? मी थोडक्यात सांगितले. मी कोठीवर जाऊन आलो हे तेथे जमलेल्या कार्यकर्त्यांना समजले तेव्हा त्यांना खूप आश्चर्य वाटलेले दिसले. त्यांनी पुन्हापुन्हा विचारले, "काय तुम्ही खरंच जाऊन आलात जुन्या कोठीवर? कोण कोण भेटले तुम्हाला? काय जीवेश्वरबाबू? एक नंबरचा बदमाश आहे तो." इ. इ.

आमच्यासाठी बाहेर एक भाड्याने आणलेली अँबेसडर उभी होती. तिच्यात आम्ही बसलो व प्रवास सुरू झाला. आम्हाला बरारी या गावी जायचे होते.

बिहारी नेत्यांच्या तोंडी काही संस्कृतप्रचुर शब्द मधूनच डोकावतात त्याची गंमत वाटते. तो म्हणत होता, "जोशीजी, अगर आप चाहे तो चलते चलते अध्ययन करेंगे।" मला वाटले, कसले अध्ययन करायचे आहे कोण जाणे! पण त्याने गाडी-बाहेर दिसणाऱ्या भागाची माहिती सांगायला सुरुवात केली. मी चाट झालो. हे कसले अध्ययन? आपल्याकडे म्हणजे अमुक ऋषीने तमुक आश्रमात फलाण्या ग्रंथांचे अध्ययन केले असे वाचायची सवय. पण तिकडे ही अजबच शब्दयोजना.

बरारी हे छोटेसे गाव. तिथे त्यादिवशी आठवड्याचा बाजार होता.

मी बाजारात एक चक्कर मारली. तिथे काय आढळले?

आपल्याकडे धान्य-बाजार असतो. धान्याची पोती, धान्याच्या राशी दिसतात. इकडे धान्याचे नाव नव्हते. होते ते कोंड्याचे ढीग. लोक धान्य घ्यावे अशा पद्धतीने तोलून कोंडा घेत होते. घासाघीस करत होते. काटा भरला नाही म्हणून मूठभर कोंडा जास्त टाकायला सांगत होते. भाजी कुठेच दिसली नाही.

बऱ्याच ठिकाणी काळे कुळकुळीत कवठाएवढे गोळे विकायला बसले होते. मला ते काय असावे याचे कुतूहल पडले. एका माणसाला विचारले, ते काय आहे?

तो म्हणाला, "हा गूळ आहे."

"गूळ? इतका काळा कसा?"

तो नुसता हसला.

याशिवाय आणखी कितीतरी चमत्कारिक वस्तू विकायला बसल्या होत्या. पण विचारायचा धीर झाला नाही.

बाजारातली माणसे बरीचशी आदीवासी होती. लंगोटी, वर फाटका शर्ट क्वचितच असायचा. नव्वद टक्के लोक उघडेच होते. दाढ्या वाढलेल्या. पाठीमागे एक बांबूची जाड साळलेली कामटी. त्याला दोन्ही टोकाला खाचा. याला दोरी लावली की धनुष्य तयार होते. त्याचा उपयोग जंगलातले प्राणी मारण्यासाठी करतात.

डाक बंगल्यात परतलो तेव्हा एसेमचे काही सर्वोदयी कार्यकर्त्यांबरोबर जुंपलेले होते. सर्वोदयी मंडळी म्हणत होती,

"आता प्राब्लूम उरलेलाच नाही. ग्रामदाने झाली. जिल्हादाने झाली. आता लवकरच बिहारदान होणार आहे."

एसेम म्हणत होते,

"बिहारदान झाले म्हणजे काय झाले? बटाईदारांना जमिनी मिळण्याचे तर बाजूलाच राहू द्या. त्यांची नावे सिकमी (कुळे) म्हणून तरी जमीनीवर चढली आहेत का? त्यांना त्यांच्या जमीनमालकांना पन्नास-पन्नासच्या हिशेबाने धान्य द्यावे लागते की सव्वीस चौदाच्या? ह्या प्रश्नाचे उत्तर द्या."

उत्तर सरळ नसे. इकडचे तिकडचेच सुरू होई. मग मुद्याला बगल मिळे. ती मंडळी शेवटी चिडून निघून गेली.

जेवणानंतर आमचा पूरग्रस्त भागात दौरा होता.

भवानीपूरच्या दिशेने आमची जीप धावू लागली. रस्ता सोडून एका मोठ्या बांधावर चढली, व अगदी अरुंद रस्त्याने धावू लागली. हळू हळू पाणी दिसू लागले. नंतर सगळीकडेच पाणी दिसू लागले. बांधामुळे पाणी अडले गेले होते. हा बांध त्यासाठीच बांधला आहे. मातीचा ८–१० फूट उंचीचा आहे. त्याच्या गंगेच्या बाजूला काटकोन करून छोटे छोटे बांध आहेत. पूराच्या वेळेस पाणी बांधावरून आत गेले होते. पाणी ओसरले तरी बांधामुळे आतील पाणी गेले दोन महिने साचूनच राहिले होते.

लोक चार बांबू रोवून त्यावर मचाण घालून त्यात बसून राहिले होते. बरेचसे लोक बांधावर आपापले संसार आणून रहात होते. त्यामुळे जीपला वारंवार थांबावे लागत होते. पिकांचा तर मागमूसही नव्हता. जिथे अशी बांधावर गर्दी आढळेल, त्याच्यासमोरच त्यांचे बुडलेले गाव दिसे.

अशाच एका बुडलेल्या गावानजिक गाडी थांबली. बांधावरून पुढे गाडी जाणेच शक्य नव्हते. आम्ही उतरलो. आमच्याभोवती माणसे जमली. कुणी विचारले, "कुठची माणसे? सर्वोदयाची का?" "नाही. संजुक्त सोस्लीस्ट पार्टीची." उत्तर.

त्यात एक माणूस बोलणारा दिसला. त्या लोकांना एसेमचे नाव माहीत होते.

त्यांना बसायला दिले. भोवती माणसे उभी राहिली.

त्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांचे बुडलेले जीवन दिसत होते. बांबूच्या गवताच्या झोपड्या अर्ध्या बुडालेल्या. बरेच दिवस पाण्यात राहून कुजट वास सगळीकडे सुटलेला. सगळीकडे पाणीच पाणी. पाण्यात दूरवर दिसणारी धार. ती गंगा. पलीकडचे काही दिसत नव्हते. अलीकडे अर्धी बुडलेली झाडं, पुढे पुढे तर दिसणारे फक्त झाडांचे शेंडे.

माणसे शिकायत सांगत होती. फक्त एकदा धान्य मिळाले होते. ते देखील माणशी दोन शेर.

एसेमनी विचारले, " तुम्हाला आता नेमके काय पाहिजे ?"

" आम्हाला बसायला जमीन पाहिजे. " त्यांनी पुढे सांगितले की, " पलीकडे जमीनदाराची पंधरा हजार एकर जमीन आहे. तिकडे दोन अडीच एकर जमीन मिळाली तर बरे होईल. "

" कलेक्टरने अक्वायर का केली नाही ? त्याला तसा अधिकार आहे. " एसेम.

" कोण जाणे. "

तेवढ्यात कोणीतरी एक अर्ज तयार केला होता, व त्यावर अंगठे, दस्तखत होत होते. मला ते कळले नाही. मी विचारले,

" ये क्या है !"

" ये पिटीसन है !"

त्या पंचवीस झोपड्यात तयार झालेला पिटीशन फार गमतीदार होता.

त्या बोलणाऱ्या माणसास विचारले, " तुम्ही काय करता ?"

उत्तर आले, " गृहस्थी करता हूँ साब !"

हा शब्द नव्यानेच समजत होता. गृहस्थी हा प्रकार देखील विलक्षण असतो. समजा एखाद्याला दहा एकर जमीन असेल; तर हे गृहस्थी करणारे लोक स्वतः शेती करीत नाहीत. कारण त्यांच्या जातीत नांगर हाती धरणं कमीपणाचे समजले जाते. म्हणून तो दुसऱ्या बटाईदारांना जमीन बटाईने देतो. दोन एकर जमीन असली तरी हा घरी बसून खातो.

अशाच एका ' गृहस्था 'स मी विचारले,

" तुम्ही जमीन का कसत नाही ?

तो म्हणाला, " जर मी कसायला लागलो, तर माझ्या घरी कोणी मुलगी देणार नाही. "

मला त्याची अडचण पटली. आम्ही परत फिरलो.

दुपारी बरारीमध्ये साडेचारला सभा गाठायची होती. सभा प्रत्यक्षात साडे-पाचला सुरू झाली. आम्ही सगळे मिळून सभास्थानी गेलो.

एका छोटयाशा पटांगणात चाळीस-पन्नास फूट उंचीचा बांबू लावला होता. त्यावर संसोपाचा झेंडा. स्टेज पेटया ठेवून तयार केले होते. स्टेजवर बरीच गर्दी झाली.

आदीवासी प्रेक्षक हातात छोटेछोटे झेंडे घेऊन बसले होते. पण ते स्टेजपासून शंभर फूट अंतर सोडून बसले होते. मला आश्चर्यच वाटले. स्टेज आणि प्रेक्षक यामध्ये जे पटांगण होते त्यामध्ये घोडे चरत होते. ही विलक्षण सभा सुरू झाली. वक्त्यांची भाषणे सुरू झाली. एक पोरगेलसा कार्यकर्ता परमानंद आपल्या भाषणात तर म्हणाला, " २ ऑक्टोबरपासून आम्ही येथे आक्टोबर क्रांती सुरू करीत आहोत. लोकहो, तुम्ही आम्हाला सहकार्य द्यावे.

लोक शंभर फुटावरून ऐकत होते.

एसेमने भाषण सुरू करण्यापूर्वीच सांगितलें की, तुम्ही जवळ येऊन बसल्याशिवाय भाषण सुरू व्हायचे नाही. मग एकेक करून सगळे पुढे येऊन बसले. मग सभा खऱ्या अर्थाने सुरू झाली. एसेमचे भाषण आधीच्या वक्त्यांच्या पेक्षा फारच वेगळे होते. भाषणात आतषबाजी नव्हती. वक्तृत्वही फारसे नव्हते. पण बोलणे सोपे होते. लोकांना समजत होते. बोलण्यामागची तीव्रता प्रत्येकक्षणी जाणवत होती.

एसेमने भाषणात 'आक्टोबर क्रांती 'वाल्यालाही सुनावले. " ऑक्टोबर क्रांती करणे म्हणजे काय पोरखेळ आहे कां ? त्यासाठी कित्येक निष्णात अशा कार्यकर्त्यांची आयुष्यभराची अविश्रांत मेहेनत, सुदृढ असे संघटन पाहिजे. इथे लोक स्टेजपासून दूर बसताहेत आणि हे कसले ऑक्टोबर क्रांती करणार ? " इ.

लोकांच्या मागे जाऊन मी उभा होतो. गर्दी न्याहाळीत होतो. सगळी माणसे उघडी. काळचा कुळकुळीत मातट रंगाची. खाली तिरप्या धावणाऱ्या फासळ्या, त्याच्याखाली लोंबणारी पोटावरची कातडी. रापलेले, सुरकुत्या मढविलेले चेहेरे, त्यातून डोकावणारे दोन गूढ डोळे.

मी त्या डोळयांचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला.

पण जमले नाही. काय वाटत असेल त्यांना ? या डोळयात कधी विस्तव पेटला असेल ? या डोळयांना कधी तीराचे टोक चढले असेल ? या डोळयांनी कधी बदला घेतला असेल की या डोळयानी सारे विझवले असेल ? सारे पचवले असेल ? सारे स्वीकारले असेल ?

मागे लटकणाऱ्या धनुष्याच्या कामठीचा उपयोग टेकायला काठी म्हणून होत असेल की खांद्यावरचे गाठोडे लटकवायला ?

सभा संपता संपता की आधी एसेमने माझ्या कानात सांगितले की, "तुला तो नक्षत्रमालाकार पाहिजे होता ना ? इथे आहे."

मला खूप आश्चर्य वाटले.

विचारले, " कुठे आहे ?"

"हे काय ?" असे म्हणून एका जाडजूड माणसाबरोबर एसेमनी माझी ओळख करून दिली.

मला काही कळेचना.

कालपासून जो भेटेल त्याला त्या नक्षत्रबाबूला मला भेटवा म्हणून सांगत असे. तो असा अचानक दत्त म्हणून उभा राहील असे वाटलेच नव्हते.

नक्षत्रबाबू ! ह्याच कां तो, ज्याला अमीर, रईस जमीनदार घाबरतात, ज्याचा गरिबांना आधार वाटतो ! ह्याच कां तो लोकांचे नाक कान कापणारा ! ह्याच का तो बेचाळीसच्या वेळेस ब्रिटिशांना दहशत घालणारा.

मी त्यांना म्हटले, " मला तुमच्याशी खूप खूप बोलायचे आहे. द्याल कां वेळ ?"

मी कोण आहे व कशासाठी आलो आहे हे सांगितले व म्हटले,

" आजच सकाळी रघुवंशबाबूंच्या कोठीवर जाऊन आलो. "

'अच्छा ? काय म्हणत होते ?'

मी हसलो व म्हटले, " म्हणत होते. नक्षत्रबाबू नाक–कान कापतो आणि गरिबांना लुटतो. "

नक्षत्रबाबू दिलखुलास हसले. व म्हणाले,

" असं ? ठीक ठीक. सकाळी तुम्ही रघुवंशच्या महालात गेला होतात, आता माझ्या गरिबाच्या झोपडीतला पाहुणचार घेणार का ?'

'घेणार कां म्हणजे ? त्यासाठी तर कालपासून तुम्हाला शोधतोय. "

'चला तर मग.'

□

# चार

झोपड्या झोपड्यातून आम्ही चालत होतो. मी नक्षत्रबाबूविषयी अंदाज बांधण्याचा प्रयत्न करीत होतो. त्याचे वय पन्नाशीच्या आसपास वाटत होते. पण प्रत्यक्षात ते ५८ ते ६० असल्याचे त्याने नंतर सांगितले. नक्षत्रबाबू काळ्या रंगाचे, चेहेरा करकरीत अँगलसनी बनलेला होता. किंचित कडवट भाव होते. चष्मा होता. चष्म्याआड एक करड्या डोळ्यांची जोडी होती. त्या डोळ्यात एक जबर हुकमत होती. चेहेऱ्यावर कोणाला हार न जाण्याची मस्ती होती.

एका झोपडीच्या समोर येऊन उभा राहिलो. तिला छोटेसे स्वच्छ सारवलेले आवार होते. आत गेलो. बांबूच्या पानांची झोपडी होती. त्यास आतून मातीने सारवले होते. त्यावर मातीच्याच एक इंची थराने मोराची, हत्तीची चित्रे काढली होती

मध्ये महिरपीत मालाकार अशी अक्षरे लिहिली होती. मी ती चित्रे पाहून थबकलो. चार महिन्यापूर्वी मुंबईला जहांगिरमध्ये बिहारी लोककलेचे प्रदर्शन पाहिले होते. त्यातले फॉर्म्स अतिशय आवडले होते. ते इतक्या अनपेक्षितपणे येथे पाहायला सापडतील असे वाटले नव्हते. मी विचारले, "कोणी काढले हे ?" उत्तर आले, "बायकोने."

आवारात दोन खुर्च्या टाकून आम्ही बसलो.

मी विचारले, "अगदी प्रथम पासून सांगाल का ?"

"का नाही ? तुम्ही हजार मैलावरून आलात. तुम्हाला सांगायलाच पाहिजे."

असे म्हणून त्याने त्याची हकीकत सांगितली.

गरीब माळी समाजात ते जन्मले. नक्षत्रबाबू तरुण वयात काँग्रेसमध्ये गेले. बेचाळीसच्या चळवळीत त्यांनी दहशतवादी चळवळ त्यांच्या भागात सुरू केली. तेथून जवळच त्यांनी रिव्हॉलवरचा कारखाना सुरू केला. त्यांच्या कारखान्यात आठवड्याकाठी ३ किंवा ४ पिस्तुले तयार होत. रिव्हॉल्वरच्या गोळ्या मोठ्या प्रमाणात तयार होत. त्याकाळी त्यांनी खूप धूमाकूळ घालून ब्रिटीश सरकारला हैराण केले होते. नक्षत्रबाबूचे शिर जो आणून देईल त्याला पाच हजार रुपये इनाम जाहीर केले होते. सरकारने यांना पकडण्यासाठी १।। ते २ लाख रुपये खर्च केले होते.

त्यावेळेस नक्षत्रबाबू गळ्यात बंदुकींच्या गोळ्यांचा पट्टा अडकावून एका हातात रिव्हॉल्वर व दुसरे रिव्हॉल्वर कंबरेला लटकावून घोड्यावरून इकडून तिकडे दौडत असे. त्यांनी आपले साथीदार तयार केले होते सवजण भूमिगत चळवळ चालवित होते. कोणी सापडेना तेव्हा ब्रिटीश सरकार हैराण होऊन गेले होते.

मी विचारले, "एवढ्या तयारीचे लोक तुम्हाला कसे मिळाले."

"तयारी म्हणजे काय होती ? सामील करून घेताना त्यांना सांगत असे, मी या खोलीत कफन ठेवले आहे. कधीही मरायची तयारी ठेवायला पाहिजे." म्हणून याने खरोखर खोलीतल्या एका जागेकडे बोट दाखविले. तेथे ते उघडे कफन ठेवित असत.

"कोणी आमच्या विरुद्ध साक्ष द्यायला जाईल त्याला आम्ही गाठत असू. त्यांना सांगायचो, या बघ दोन गोळ्या. या खिशात टाकल्या आहेत. या तुझ्या नावाच्या आहेत. असें सांगून आम्ही त्याला खलास करत असू. एकेका खटल्यातले आठआठ साक्षीदार मी खलास केले आहेत."

मी ऐकतच राहिलो. हकीगत सांगताना 'उसे खतम किया, पाँच लोगों को खलास किया' असे अगदी तो सहजतेने सांगत होता.

"जमीनदारांचा व तुमचा लढा कधी सुरू झाला ?"

"तेव्हापासूनच. त्यावेळेस ब्रिटीश सरकार जरी होते तरी सत्ता जमीनदारांचीच होती. ते ब्रिटिश सरकारचे एजंटच होते. त्यामळे जसे पोलिस माझ्या मागे लागले

होते त्यापेक्षा अधिक जमीनदारांचीच माणसे मागे लागली होती.

"मला पकडायचे जमेना तेव्हा जमीनदारांनी युक्ति केली व ती अगदी आमच्या मुळावरच बसली."

"काय केले त्यांनी ?"

"त्यांनी माझ्या नावावर गरिबांच्या घरावर डाके घालायला सुरुवात केली. म्हणजे डाके जमीनदारांच्या माणसांनीच घालायचे व सर्व विभागात असे उठवायचे की नक्षत्रबाबूने हा डाका घातला. ही युक्ति अशी होती की, जिससे जनता हमे पुलिसके सामने फेंक देगी !

"एक दिवस मी येत असताना एक मित्र भेटला. त्याने मला बाजूला नेले व तो म्हणाला, "अब तू जनताके जगलमे छिप नही सकता। तेरे नामपर रेप हो गया है।"

"मी हादरलो. कारण डाके घातले तरी नुकसान नव्हते एवढे रेपच्या प्रकारामुळे येणार होते. आम्ही पाचजण होतो. ताबडतोब घोड्यावर मांड टाकली व ते गाव गाठले. रात्रीचे बारा वाजले होते. आम्ही पोहोचलो तेव्हा त्या मुलींचा बाप डोकं खाली घालून बसला होता. तो आम्हालां पाहताच रडायला लागला. म्हणाला, 'हे काम तुमचं नाही असे मला वाटलेच होते.' मी म्हणालो, 'कुठायत मुली ? त्याने आत बोट दाखवलें. आम्ही आत गेलो.

आत खाटेवर दोन मुली पडल्या होत्या. बेशुद्ध होत्या.

"या वेळेपर्यंत आम्ही आलो आहोत ही बातमी पसरून एक हजाराचा जमाव त्या आवारात जमला होता. मी त्या जमावासमोर गेलो. एका उंच पिंपावर चढलो. एक गोळी हवेत उडवली. सगळ्यांना उद्देशून म्हणालो,

"हे माझं रिव्हॉल्वर. यात या बघा मोजून पाच गोळ्या भरत आहे. आम्हा पाच जणांसाठी आहेत. तुम्हाला वाटत असेल की आम्ही हे कृत्य केलं आहे. मग आम्हाला या गोळ्यांनी खतम करा." असं म्हणून मी प्रत्येकाच्या हातात पिस्तुल देत असे व सांगत असे मार मला म्हणून.

तो म्हणे 'तुम्ही केलं नाही हे आम्हाला माहीत आहे.'

मी म्हणे "मग कोणी हे केलं त्याचं नाव सांग."

तो म्हणे, 'ते मी सांगू शकणार नाही.'

"शेवटी एका ऐंशी वर्षाच्या म्हाताऱ्यास मी ढोस भरला, तू आज मेला नाहीस तर उद्या मरणार आहेस, मरता मरता एकदा खरे बोलून मर. त्याने दोन नावे सांगितली. ते जमीदारांचे दोन माजलेले ब्राह्मण हस्तक होते.

"त्यांना ओळखण्यासाठी तिथल्या एका पोराला घेतले व घोड्यावर घातले. दोन दिवस तलाश केला. शेवटी एका जमावात ते आहेत असे कळले. ओळखणारा पोरगा घाबरू लागला. मग त्याचे जरा वेषांतर केले. त्याने ते दोघे दाखविले.

पिस्तुले हवेत उडवून त्या दोघांना गिरफ्तार करून त्या गावी आणले व म्हाताऱ्या-पुढे टाकले व म्हटले 'हेच का ते दोघं?' त्यातला एक खरा होता. दुसऱ्यास दम देऊन हाकलून दिले.

हजारावारी जमाव जमला होताच. मी त्याला एका खांबाला बांधले. त्याच्या अंगावर सगळीकडे जखमा केल्या. त्यावर मीठ चोळले. शेवटी विचार केला, याला मारून काय उपयोग? याची दहशत बसली पाहिजे म्हणून त्याचे नाक व कान कापून परत पाठवून दिले.

"त्यानंतर जे जे फितूर झाले अशा आठ दहा लोकांचे नाक कान मी कापले.

"या प्रकारांनी जमीनदारांना फारच दहशत बसली. मी त्यांच्याकडे जासूदाबरोबर चिठी पाठविली, की दहा हजार रुपये पाठवा; की त्याच्याबरोबरच ते पैसे पाठवत. मी देवळात जमून ते लोकांना वाटून टाकीत असे."

"स्वातंत्र्यापूर्वी दोन दोन वर्षांच्या दोन शिक्षा झाल्या. ४७ साली सुटलो. त्यानं-तर आपल्या काँग्रेस सरकारने मला पकडून पंधरा वर्षांची शिक्षा ठोठावली."

मी विचारले, "काय, पंधरा वर्षांची शिक्षा?"

"हो. ५१ साली शिक्षा झाली, परवा ६६ साली सुटलो. पंधरा वर्षं एका खोलीत होतो. मला वाढायला एकजण यायचा. त्याला देखील बोलायची परवानगी नसे."

"तुम्ही पंधरा वर्षे कशी काय काढलीत? एखाद्यास तर वेडच लागले असते."

"त्यासाठी मी युक्ती केली. मी व्यायाम सुरू केला. खूप व्यायाम करून खूप खायचे. गेलो त्याच्यापेक्षा दुप्पट होऊन बाहेर आला."

"आल्यावर काय केले?"

"सुटल्यावर मी डायरेक्ट घरी आलो नाही. पटन्यास गेलो. मुजफ्फरपूरला गेलो. दोनशे छप्पन्न सभा घेतल्या व नंतर घरी आलो."

नक्षत्रबाबू सांगत असता आतून दाराच्या चौकटीत एक शेलाटी स्त्री उभी राहिली. त्यांची ती बायको असावी. ती त्यांना म्हणाली, "तरकारी (भाजी) नाही आणली तर स्वयपाक कसा करायचा?"

नक्षत्रबाबू वैतागले, "वेळ नाही झाला. सांगितले ना? आज मिठाबरोबरच भाकरी खाईन." ती खट्टू होऊन आत गेली.

मी विचारले, "या आपल्या पत्नी का?"

"हो. हिने बिचारीने कसे दिवस काढले हे तिचं तिलाच ठाऊक. माझी आई तर भीक मागून मेली. माझ्या पश्चात पंधरा वर्षं जमीनदारांनी हिला काम मिळू दिलं नाही. निरनिराळ्या प्रकारांनी त्रास दिला. पण हिने सगळे सोसले."

नक्षत्रबाबूंचा नवाच पैलू दिसत होता.

माझ्या डोळ्यासमोरून चौकटीत उभी राहिलेली शेलाटी स्त्री हलेना. तिच्या चेहऱ्यावर तिनं जगलेले सारं जीवन जणू गोंदलेलं होतं. चेहेऱ्यावर विलक्षण असा शांत

षला होता. मी तिनं बगलेल्या जीवनाची कल्पनाच करू शकलो नाही.

बराच वेळ एक म्हातारा माणूस हातापायाची जुडी करून पेऊन बसला होता. त्याच्याकडे अचानक नक्षत्रबाबूंचे लक्ष गेले.

"कायरे, काय काम आहे?" असे विचारताच तो रडायला लागला. नक्षत्रबाबू जेव्हा रागावला तेव्हा तो बोलू लागला. त्याचं घरदार जमीनदारांच्या माणसांनी उध्वस्त करून टाकून त्याला जमीनीवरून हुसकावून लावून त्याला बेघरव बेदरवा केले होते.

नक्षत्रबाबूंनी शांतपणे त्याला विचारले,

"घरमें अकेला ही है?"

"जी नही, दो लडके है।"

"छोटे है या बडे?"

"बडे है और दो बहुभी हैं घरमें।"

"घरमे लाठी थी?"

"थी"

नक्षत्रबाबू एकदम आवाज चढवून म्हणाला,

"तो काहेको नही चलायी? अभी बेघर हो गया, भीख माँगते माँगते. मर जाएगा। उधर क्यूं न मरा? मरने का तो थाही न? तो लाठीको भाला क्यं न बनाया?

"मारने का नही था लेकिन हिंमत तो दिखायी होती, तो वे भाग जाते थे। लेकिन तुम लोग तो डरके मारे पहले ही भागते हैं।"

"साब, आप चलो उधर। मै पाँव पडता हूँ।" म्हणून तो पाया पडू लागला. नक्षत्रबाबूने त्याला झिडकारले,

"मी बुळीच येणार नाही. नक्षत्रबाबू काही कोणाला जमीन देत नसतो. तुम्ही लढायला पाहिजे. तुमच्यात हिंमत नाही. नक्षत्रबाबू एकटा काय करणार तेथे?"

शेवटी हो ना करता अमुक दिवशी तिकडे येतो असे सांगितल्यावर तो गेला.

मी विचारले, "याची केस तुम्ही कशी डील करणार?"

"मी तेथे जाईन. जरा दमदाटी केल्यावर ते जाग्यावर येतात."

"जमीनदार अजूनही कितपत अन्याय करतात?"

"बहोऽऽत जुलूम है इधर डाक्टरसाब." असे बोलून नक्षत्रबाबू सांगू लागले, "य सब पूर्णीयामें पाँच सात सामंतोंकी टोली है। कुरसेला का रघुवंश-१०,००० एकड, साळेपूरका जाको और राकोउद्दीन–१०,००० एकड, धमधाह का मौलबाबू-३२,००० एकड जमीन, साहूपरवानाका रामगुलामसा–१५,००० एकड जमीन, सोलपूराका उबरशाहू–१५००, लक्ष्मी नारायण सुधांशु जो लोकतांत्रिक दलके एम्. एल्. ए. और स्पीकर थे–१५०० एकड. ऐसे सब गुंडोंकी टोली हैं। लोगो को बहूत जुलूम लगाते है।"

मी विचारले, "स्त्रियांच्या बाबतीत कसे वर्तन आहे?"

"काय सांगू? आमच्या गावामध्ये कोठल्याही मुलीची शादी जमीनदाराने ठरवल्याशिवाय होत नाही. जमीनदार ठरवतो, की मुलगी लग्नाची झाली आहे की नाही! ते जमीनदाराला कळणार कसे? मग पाठवा मुलीला रात्री जमीनदाराच्या कोठीवर!"

नक्षत्रबाबू बोलता बोलता अगदी ऑफ व्हायला आला होता. तो जे सांगत होता ते केवढे भयानक होते!

मी विचारले, "सध्या हे प्रकार चालू आहेत?"

"मागे तर फार होते. आता जरा कमी आहे. पण अप्रत्यक्षपणे म्हणजे पैशाच्या लालुचीने व अधिकाराच्या जोरावर आता तेच प्रकार पूर्वेवत सर्रास चालू आहेत."

"तुमचा पक्ष कोणता?"

"उजवा कम्युनिस्ट पक्ष."

"मला वाटलं तुमचा डावा कम्युनिस्ट पक्ष आहे. कामाची पद्धत तर त्यांच्यासारखीच आहे. उजव्यात का राहिलात?"

"सगळे साथीदार, सहकारी या पक्षात आहेत म्हणून."

मला आश्चर्य वाटलं.

काही वेळाने मी विचारले, तुमचे 'भूमनाथ झील' हे काय प्रकरण आहे?"

ते हसले, "तुमच्यापर्यंत ते आले का? काही नाही. गंगेला जेव्हा बाढ येते, तेव्हा भूमनाथ टेकडीच्या पलीकडे खूप पाणी साचून राहते. वर्षानुवर्षे हा प्रकार आहे. पाण्याचाही कोणता उपयोग नसतो (कारण पलीकडेच नदी आहे). आणि पाण्याखाली जमीन फुकट अडकून पडते. मी असा विचार केला की बांध जर एखाद्या ठिकाणी फोडला तर हे पाणी सगळे वाहून जाईल व सुमारे पंचवीस हजार एकर जमीन लागवडीस भूमिहीनांना देता येईल.

मी याच्याकरिता बऱ्याच जणांना भेटलो. इंजिनिअरांनी ती स्कीम यशस्वी होईल असे सांगितले. कमिटी नेमली गेली. त्याचा मलाच अध्यक्ष नेमले. आम्ही हे काम श्रमदानाने करायचे ठरविले. प्रत्यक्ष कामावर गेलो तर अटक झाली. मधल्या काळात जमीनदारांकडून चक्रे फिरवली गेली होती.

"का? असे का केले त्यांनी?"

"लोकांना सवय होईल स्वतःला जमीन असण्याची. आणि दुसरे म्हणजे माझे महत्त्व वाढेल हे!"

पूर्णियातली समाजचक्रे व त्यांच्या हालचाली आता ध्यानात येऊ लागल्या होत्या. भूमनाथ झीलसारखे रचनात्मक काम की, ज्यातून गरिबांच्यासाठी पंचवीस

[ पृष्ठ ५४ वर

उज्ज्वला गोविंद आगासकर

# हार जीत

सरत्या श्रावणातली एक सडपातळ दुपार. बोरीबंदरहून ठाण्याकडे फास्ट जाणाऱ्या लोकलच्या फर्स्टक्लास डब्यातला लेडीज् कंपार्टमेंट. प्लॅटफॉर्मवरल्या तुरळक गर्दीमुळे स्टेशन येऊन गेले तरी जाणवत राहणारा शुष्कपणा. रुळांवर खडखडणाऱ्या लोखंडी चाकांच्या सुराची लय आणि क्वचित् कुठेतरी आक्रोशणारा कावळा.

आकाशात पिंजून दाटलेल्या ढगांचा पातळ थर आणि त्यातून गाळून येणारे निस्तेज ऊन—असल्या त्या निष्क्रिय वेळी एक विलक्षण कथा रुजते आहे असे मला तरी वाटले नाही!

खिडकीजवळच्या गाद्यांवर सुनन्दा आणि मी समोरासमोर बसलो होतो. गाडीला गर्दी तर नव्हतीच, आमच्या कंपार्टमेंटमध्येसुद्धा पलीकडे बसलेल्या एका वृद्ध पारशी स्त्रीखेरीज चवथे कुणी नव्हते. प्रत्येक स्टेशनवर ती वृद्धा डोळे किलकिले करून स्टेशनचे नाव वाची आणि पुन्हा हातातली लेस विणणे सुरू करी.

एरव्ही लोकलने जाताना आम्ही कधीही गप्प बसत नव्हतो. कुठचाही प्रचलित विषय आम्हाला गप्पांसाठी चाले. आज मात्र, हवाच उदासवाणी पडली होती. मी कुठलंतरी मासिक चाळत होते आणि सुनन्दा खिडकीबाहेर बघत गप्प बसली होती.

कदाचित् या घुमेपणाला आपणच कारण असू अशी एक तीक्ष्ण शंका माझ्या मनात सूर मारून गेली आणि हातातले मासिक मिटून मी बाजूला ठेवले.

"मघा स्टेशनवर येताना तू काहीतरी सांगत होतीस ते अर्धवटच राहिलं बघ—




काल तुझी मावस बहीण आली होती तुमच्याकडे, त्याबद्दल !" तिला बोलती करायला मी म्हटले.

खिडकीबाहेर कशात तरी गुंतवलेली स्वतःची नजर तिने मोठ्या प्रयासाने सोडवून घेऊन आत वळवली आणि माझ्याकडे पाहिले-

"काय म्हणालीस तू ?"

"अग काल तुमच्याकडे..."

"फोर्थ इयरच्या रानडेला ओळखतेस ना तू ?"

रानडे म्हणजे कॉलेजमध्ये राहून माहीत नसणारी बाब नव्हतीच मुळी ! शिवाय दादांची नि त्याच्या अण्णांची ओळख असल्यामुळे, ओळखसुद्धा करून घ्यावी लागली होती—

"ओळखते ना. का ग ?"

"माझी त्याच्याशी ओळख करून देशील ?"

हे म्हणजे काहीतरी नवीनच होते. बरे, खूळ म्हणावे तर सुनन्दा ही चांगलीच विचारी नि समजूतदार मुलगी ! रानडेची कीर्ती तर सारीकडे दुमदुमून राहिलेली —नि ही स्वतःहून त्याच्याशी ओळख करून मागते ! माझी खात्री होती, सुरेन्द्राने कधी हिच्या वाटेला जाण्याचा प्रयत्न केला नसता—

"काही काम आहे का तुझे, नन्दू ?"

"समजेल लवकरच. तू ओळख करून दे म्हणजे झालं."

जाऊ द्या झाले–मी मनात म्हटले. ससा जर स्वतःच्या हिंमतीवर कोल्ह्याला भेटायला जातो आहे तर आपण कशाला चोंबडेपणा करा !

□

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे कॉलेजला जाण्यासाठी आम्ही सकाळी दादर स्टेशनवर जमलो. ठरलेली लोकल, ठराविक चेहरे–त्याच त्या गप्पा. नन्दूसुद्धा नेहमीसारखी इतरांशी नि माझ्याशी गप्पा मारत होती–

मला मात्र उगीचच अस्वस्थ वाटत होते. एखाद्या काट्याचे बारीकसे टोक पायात रूतून राहिलेले असले म्हणजे आपण वरकरणी नेहमीसारखेच वावरतो, पण वेदनेतून त्याचे अस्तिव जाणवत असतेच ! नन्दूला दिलेल्या कबुलातीतून काही विचित्र तर निष्पन्न होणार नाही ना, अशी रुखरुख सतत मला लागून राहिली होती.

नि त्याला कारणदेखील तसंच होतं. दुसरा एखादा साधा मुलगा असता, नि त्याच्याशी नंदूनं ओळख करून मागितली असती तर–

रानडे म्हणजे भलतंच प्रकरण होतं ! त्याचे मित्र त्याला बच्चू म्हणायचे. गोऱ्यापान आणि सोनेरी केसांच्या बच्चूवर फिदा होऊन त्याच्याबरोबर फिरणाऱ्या मुलींची सर जे. जे. च्या आवारात वाण नव्हती. घरचा चांगला श्रीमंत नि एकुलता एक मुलगा–मग त्यानं कॉलेजात येऊन, अभ्यास करणं ही गोष्ट " फक्त बावळटांसाठीच " असा जाहीर शेरा मारून सारा वेळ कँटीनमध्ये घालवावा हे ओघानंच आलं–कँटीनमालक मात्र बच्चूशेठवर भलताच खूष. कायम गिऱ्हाईक होतं ना ते त्याचं ! सर्व प्राध्यापक मात्र त्याला ' वाया गेलेला मुलगा ' म्हणायचे–

–हे त्यालाही माहीत होतं. कॉलेजमध्येच नव्हे तर घरीदेखील तो जगावरून ओवाळून टाकलेल्यात जमा होता. खरं तर घरी तो नको होता; म्हणूनच एकेका वर्षात बराच मुक्काम ठोकण्याचे त्याचे पराक्रम ठाऊक असूनही त्याला फी भरली जात होती–तोच हे सगळ्यांना सांगायचा–नि वर खो खो हसायचा !

□

मधल्या सुटीत आम्ही लेडीज् रूममधून बाहेर पडलो. नन्दू मला म्हणाली,

" अुज्ज्वला, कँटीनकडे जाऊ या."

" चल."

तिथपर्यंत पोचल्यावर मी विचारलं.

" काय मागवायचं ?"

" काही नाही."

" मग ?"

" आत तो बसला आहे बघ."

आता कुठे माझ्या लक्षात आलं ! नन्दू आणि स्वतःहून कँटीनकडे वळली तेव्हाच

कळायला हवं होतं खर म्हटल्यास !

कँटीनच्या हॉलमध्ये त्या दिवशी प्रथमच मी पाऊल टाकलं. इकडेतिकडे न पाहता सरळ तो बसला होता त्या टेबलापाशी जाऊन त्याला दोन मिनिटांसाठी म्हणून मी बाहेर बोलावलं. "आत्ता यतो" असं दोस्त लोकांना सांगून तो माझ्या-बरोबर बाहेर निघाला, तेव्हा त्याला गराडा घालून बसलेल्या नटव्या मुलींनी नाकं मुरडली हे मात्र माझ्या लक्षात आलं—बाकीच्या मुलानी टेबलांवर हात, जमिनीवर पाय नि कपबशात चमचे वाजवून कहर केला...

ठरल्याप्रमाणे मी त्या दोघांची ओळख करून दिली, नि ती तिच्याच इच्छेनुसार, हे कळताच रानडे चक्क भांबावला !

"याला तसं काही कारण ?"

"काही नाही, सहज." नन्दू अगदी धिटाइन बोलत होती.

"पण मी वाया गेलेला आहे हे तुम्हाला सांगितलं नाही वाटतं यांनी ?" माझा निर्देश करून रानडेचा नन्दूला प्रश्न.

"मी ठरवीन ना काय ते." नन्दू हसून म्हणाली. रानडेचा चेहरा जरा नॉर्मल-वर आला.

"चहा घ्यायला येणार ?" त्यानं अदबीनं विचारलं.

"चला ना." नन्दू सहजगत्या म्हणाली आणि मला आणखी एक धक्का बसला ! मी मात्र शिताफीनं तिथून सुटका करून घेतली आणि लेडीज् रूममध्ये जाऊन बसले.

कँटीनमध्ये काय झालं हे संध्याकाळी परत जाताना मीही नन्दूला विचारलं नाही नि तिनंही मला सांगितलं नाही.

त्यानंतरचे काही दिवस कॉलेजात या चमत्कारावर चर्चा झाली, पण ती थोडीच. मुलींना नादी लावण्याच्या रानडेच्या पात्रतेबद्दल कुणाचंच दुमत नव्हतं, शिवाय सहामाही परीक्षा जवळ आली होती.

मला मात्र अगदीच अवघडल्यासारख होत होतं. कॉलेजमधल्या बाकीच्या मुली, प्रत्यक्ष नन्दूशी बोलणं जमत नसल्यानं मलाच गाठत असत....

"काय, आरंभलंय् काय तुझ्या मंत्रिणीन ?"

"जाणूनबुजून डोळ्यावर कातडं ओढायचं म्हणजे—"

"झोपलेल्याला जागं करता येईल, पण मुद्दाम झोपेचं सोंग घेतलेल्यांना कोण काय करणार ?"

"चांगली हुशार मुलगी ग ! आता अगदी वाया जाणार बघ !"

"तर काय ! स्पष्ट लक्षणंच दिसताहेत मला तरी !"

मी बापडी मुखस्तम्भासारखी हे सर्व झलीत रहायची. करणार काय ? नन्दूची बाजू मला माहीत असती तर तिच्या वतीने समर्थन तरी केलं असतं—पण तिने

मलाही अंधारातच ठेवलं होतं ना!

त्यामुळे घरच्या आघाडीवरसुद्धा मला नि:शस्त्रपणेच मुकाबला करावा लागत होता.

सहामाही झाल्यावर एकदा संध्याकाळी मी नन्दूच्या घरी गेले. त्याच वेळी तिचे आप्पा कुठेतरी बाहेर जायला निघाले होते. दार त्यांनीच उघडलं.

"ही पहा आलीय् तुमच्या सुकन्येची मैत्रीण!" त्यांनी स्वयंपाकघराच्या दिशेने पहात घोषणा केली आणि माझ्याकडे लक्ष न देता ते नुकत्याच उघडलेल्या दारातून बाहेर निघून गलेही!

आप्पा खूप कडक आहेत हे तोपर्यंत नन्दूकडून बऱ्याच वेळा ऐकलं होतं. घरी प्रवेश केल्याबरोबर अंगावर आल्यासारखं वाटणारं, पुढेच ठेवलेलं गोदरेजचं अगडबंब कपाट. "इथे कशाला?" म्हणून विचारलं तर त्याला "आप्पांनी सांगितलंय् म्हणून" याखेरीज उत्तर नसे. खरं म्हणजे इतक्या कडक वडिलांच्या या लाडक्या मुलीनं हे काय नि कसं आरंभलंय् हाही एक यक्षप्रश्नच होता! कदाचित् घरी इतकी कडक वागणूक मिळाल्यामुळेच बाहेर नन्दू सैल सुटली असेल—

झरकन् हे सगळं मनात येऊन गेलं. तोपर्यंत नन्दूच्या आई आतून बाहेर आल्या होत्या. मी मात्र अजून खिळल्यासारखी दारातच होते!

"नन्दू आहे का?" मी जरा भीतभीतच विचारले.

"तू जरा बैस पाहू."

बसले.

"नन्दू घरात नाही. जाताना तुझ्याकडे जाते म्हणून सांगून गेली होती."

माझ्या पोटात भलाथोरला खड्डा पडला. काय वाढून ठेवलं आहे पुढे कोण जाणे!

पण अशी कल्पना कुणाला आधीच आली असती तर—

अनपेक्षितपणे निर्घृण प्रहार करणाऱ्या अतिमानवी शक्तीचं अस्तित्वच कुणी मानलं नसतं!

येणारे हुदके प्रयासानं आवरीत मी त्यांना पटवून देत होते — की काय प्रकार आहे त्याची मलादेखील खरोखरीच कल्पना नाही — नन्दूनं कसला मार्ग स्वीकारला आहे तेही मला ठाऊक नाही — मला विश्वासात घेऊन ती अलीकडे काहीच सांगत नाही — वगैरे.

खरोखरीच तसं चाललं होतं. पण नेहेमी घरी येणारी मुलगी, शिवाय लेकीच्या वर्गातली — कॉलेजला जातायेताना दोघी बरोबरच असतात — या पार्श्वभूमीवर नन्दूच्या आईंना ते खरं कसं वाटावं?

शिवाय "उज्ज्वलाकडे जाते" म्हणून सांगूनच ती घराबाहेर पडली होती!

मी मात्र फार वेळ थांबले नाही तिथे. थांबवलंच नसतं माझ्याच्यानं!

□

दुसऱ्या दिवशी दुपारी सगळं शांत असताना दाराची बेल किणकिणली.

मी पहायला गेले.

दार उघडलं, तर समोर उभी नन्दू.

"काल काय बावळटपणा केलास तू!" हे वर मलाच, नि दारातच! मी चिडलेच.

"तू आत चल आधी." नाहीतर काय!

जेमतेम आत येऊन बसली मात्र–

"काय चक्रम आहेस उज्ज्वला!"

"हो मी चक्रम. तुझ्याबरोबर फिरते म्हणून चक्रम. तुझी मैत्रीण म्हणवून घेते, नि तू काय करतेस याचा पत्ता नाही म्हणून चक्रम. ते विचारीत नाही म्हणून देखील चक्रम. सगळे मला विचारतात तेव्हा उत्तर देता येत नाही म्हणून चक्रम. आणखी काही?"

"तसं नाही ग—"

"काही चुचकारण्याची गरज नाही."

"चिडू नको बुवा तू उगीच—"

"उगीच? उगीच बोलते काय मी? काल तुझ्या आई निष्कारण मला दोष देत होत्या तेव्हा मला अगदी छान वाटत होतं नाही का? कॉलेजमधल्या सर्व मुली काय काय बोलतात तुझ्याबद्दल ते ऐकून मला अगदी गुदगुल्या होत असतील नाही?"

"जरा ऐकून तर घेशील...."

"पुष्कळ ऐकून घेतलं. बाहेरच्यांकडून, घरच्यांकडून अगदी तुझ्या आईकडून. आता तुझंच ऐकायचं राहिलय् फक्त!

"तेच सांगते. विनाकारण त्रागा करून घेऊ नकोस. आईनं विचारलं तर 'सकाळी आली होती आमच्याकडे, मग दुसऱ्या मैत्रिणीकडे गेली' असं तुला सांगता आलं नसत का? पण मीसुद्धा जाताना तुला सांगायला विसरलेच—"

"बरीच आठवण आहे म्हणायची आमची!"

"किती रागावशील ग! जरा ऐकून घे – काल मोटर वाटत बिघडली म्हणून— नाहीतर मी आजच परत येणार होते."

"म्हणजे काय?"

"म्हणजे आम्ही काल लोणावळ्याला जात होतो."

"आम्ह...?" माझ्या आवाजात अनिश्चिततेबरोबरच संशयदेखील डोकावत होता!

"म्हणजे बच्चू नि मी."

मी जागच्याजागी उभी थिजले! ही सुनन्दा, आतापर्यंत आपला अभ्यास बरं

नि आपण बरं म्हणणारी, कधी मान वर करून कुणाकडे न पाहणारी ! ही बच्चू-बरोबर लोणावळयाला जाणार होती – नि तेही एक दिवस रहायला ! !

अशक्य ते शक्य होण्याबद्दल बरंच काही अद्भुत कथातून वाचलं होतं – आता मात्र आभाळाला मी ठिगळ लावलं असं कुणी सांगितलं असतं तरी मी तेही मानलं असतं !

"तुझं डोकं ठिकाणावर आहे का नम्दू ?"

"चांगलं आहे. तुम्हाला कुणाला आतापर्यंत मी काहीच सांगितलं नाही – एवढ्यासाठीच, की तुमच्या दृष्टीनं तो वेडेपणा आहे. बच्चूला मी वचन दिलंय् की – की त्याच्यासाठी मी वाटेल ते करीन."

"का पण ? त्याच्यासारखा उनाड..."

"उनाड असला तरी माणूस आहे ना तो ?"

"पण तो किती उच्छृंखल प्रवृत्तीचा आहे ते तुलाही, ऐकून तरी ठाऊक होतं ना ? आता तर आणखी लक्षात आलं असेल, जवळून पाहिल्यामुळे —"

"हेच ते. एखाद्याला सतत हिणवल्यामुळे तो जगाबद्दल तुसडा होत जातो नि मग मुद्दाम, आणखी बिथरून, उद्दामपणे वागतो एवढंही लोकांना समजू नये का ? की एखाद्याला आयुष्यातून उठवण्याचा निश्चय केल्याप्रमाणे,तो पाळायला साऱ्यांनीच हातभार लावायला हवा ? जाऊ दे. इतरांशी मला काय करायचंय् ? मी मात्र इतरांना न दिसलेला बच्चू शोधणार आहे. करता येईल तेवढं मी करीन. त्याला जर लोकांनी, आता म्हणतात तसं 'वाया गेलेला' म्हणायचं सोडलं तरी मला पुरे !"

"पण त्याच्यासाठी इतकं सोसण्याची तुलाच काय गरज होती ?"

"ते मला माहीत नाही. सध्यां त्याला माझी गरज आहे एवढंच मला ठाऊक आहे !

खरोखर आभाळाला ठिगळ लावायला निघालेली मुलगी ही—मला वाटलं. हिच्या पुढे बोलणार तरी काय ?

¤

सर जे. जे. आर्किटेक्चर कॉलेजचं गॅदरिंग म्हणजे दर वर्षी एक सोहळाच असतो. शंभर दीडशे वर्षांपूर्वीचे प्रचंड वड, पिंपळ, दाटी करून राहिलेले इतर अनेक वृक्ष, विस्तृत हिरवळी आणि जुन्या इमारतींमुळे आधीच मुंबईच्या गडबडगोंधळाचा पडलेला विसर नि त्यात तारुण्य सुलभ उत्साहाने नटून सजून धावपळ करणारे विद्यार्थी.

जिमखाना सेक्रेटरी असल्यामुळे रानडेदेखील अगदी रुबाबात होता. कदाचित् सर्वांच्या नजरांचा अपेक्षाभंग करणारी एक गोष्ट म्हणजे, यावेळी त्याच्याबरोबर दुसरीच एक मुलगी होती ! अर्थात् बहुतेकांना आश्चर्य वाटलं नसावं. नंतर वृत्तान्त मात्र जरा चमत्कारिकच आला.

एका धाडसी मुलानं म्हणे त्याला गांठून विचारलं होतं,

"अरे ती सेकंड इयरची देशपांडे नाही ती तुझ्याबरोबर?"

"कोण, ती आमटी? मला सुधरायला निघाली आहे म्हणे! अरे यार, आपल्याला तर आता ऑम्लेट सापडलंय् ऑम्लेट!"

नन्दूची यावरची प्रतिक्रिया विचारण्याचं धाडस मी केलंच नाही!

३

तिच्या घरी अर्थातच हा प्रकार अत्यंत तिरस्करणीय गणला जात असला पाहिजे. मागल्या वेळच्या प्रकारानंतर मी काही तिच्या घरी जाण्याच्या फंदात पडले नव्हते. आधी नन्दूचा उद्देश ठाऊक नव्हता म्हणून, आता ठाऊक होता म्हणून, मलाच अपराध्यासारखं वाटे!

पण आप्पा कांही गप्प बसणार नव्हते. सेकंड इयरची आमची परीक्षा आटोपल्या-बरोबर महिन्याभरातच, त्यांनी आधीच हेरून ठेवलेल्या एका सुखवस्तु तरुणाशी नन्दूचं लग्न लावून दिलं. थाटमाट बराच केला होता. सासर बरंच श्रीमंत असणार. दागिन्यांनी नखाशिखान्त सजलेली विनम्र नन्दू किती गोजिरवाणी दिसत होती! डोळे मात्र कशामुळे ओलावले होते हे नक्की नव्हतं कळत!

लग्नानंतर ती सासरी रहायला गेली. मुक्काम औरंगाबाद!

वार्षिक परीक्षेचा निकाल लागला. आश्चर्य म्हणजे यंदा रानडे पास होऊन पांचव्या वर्षाला गेला होता. नन्दूसुद्धा चांगली उत्तीर्ण झाल्याच कळलं, पण शिक्षणाला आपण अगदीच पूर्णविराम नाही तरी अर्धविराम दिल्याचं तिनं पत्र लिहून कळवलं होतं.

नि मग आमचा थर्ड इयरचा अभ्यास चालू झाला. नन्दू नसल्याची सुरुवातीला बरीच जाणीव व्हायची, नतर हळुहळू सवय झाली. आमचा पत्रव्यवहार मात्र चालू होता.

एका मुलीनं कॉलेज सोडून जावं यात विशेष काही नव्हतंच. भोवती इतक्या मुली सहजगत्या जमवणाऱ्या रानडेला तर त्यात मुळीच काही वाटलं नसेल!

या वर्षी तो जवळजवळ एकचित्ताने त्या दुसऱ्या मुलीबरोबर वावरत होता. तसं पाहिलं तर त्याचं हे अभ्यासाचं शेवटचं वर्ष म्हणजे महत्त्वाचं होतं. चवथ्या वर्षाला त्याने केलेला विक्रमी मक्काम ज्यांना माहीत होता ते सर्वच, समप्रमाणात तो या वर्षीचा मुक्काम किती लांबवणार याचा हसत हसत हिशेब करीत!

रानडेला झुलवणारी ही पहिलीच खमकी मुलगी होती की काय कोण जाणे! नाहीतर तो इतका अस्वस्थ झालेला कधी दिसला नव्हता. कँटीनमध्येच त्याचा मुक्काम असायचा— पण सतत ओठांत सिगारेट! पीतदेखील असेल एखादवेळेस— कारण डोळे अगदी तारवटलेले दिसायचे. त्यावर्षी तो सहामाहीला बसला नाही. पूर्वपरीक्षेला देखील बसला नाही. यात नवीन किंवा अनपेक्षित काही नव्हतच.

वार्षिक परीक्षा चालू असताना मात्र भलतंच अनपेक्षित काहीतरी घडलं–

वर्षानुवर्ष भक्कमपणाने उ ' असलेलं एखादं अवाढव्य घरण, उरातल्या भेगांनी व्याकुळ होऊन एखादे दिवशी ध्यानीमनी नसताना सपशेल कोसळावं, नि चहूकडे हाहा:कार उसळावा–

घनदाट अरण्यात वणवा पसरत नाही म्हणून अग्नीनं शरण यावं–

प्रचंड उद्रेक होऊन एखादा ज्वालामुखी स्वत:च खचावा नि तिथे जलाशयाने अंग पसरावं–

सारे निस र्गाचेच चमत्कार !

सुरेन्द्र रानडेने पिस्तुल झाडून घेऊन आत्महत्त्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात आली मात्र–

सारी कडे एकच खळबळ उडाली ! खुद्द कॉलेमध्ये तर श्रावणातल्या मेघांसारखं उदास काळं सावट दाटलं होतं.

भरीत भर म्हणून त्याने लिहून ठेवलेल्या पत्रातला तो मजकूर—

" प्रेमभंग झाल्यामुळे आत्महत्त्या करीत आहे – ! "

सुरेन्द्र रानडे आणि प्रेम ! निवडुंग आणि कोवळेपणा ! किती विसंगत कल्पना ! पण वर दिसणाऱ्या कांटयांवरून जगाने परीक्षा केली– अंतरीचा ओलावा ओळखून जागृत करू शकली फक्त नन्दू !

नंतर आठवडयाभरांतच सौ. नन्दू माहेरपणासाठी मुंबईला आली.

थोडया दिवसांनी आमच्या घरी मला भेटायला म्हणून आली. तशी दिसत होती कोरडीच.

पण आतल्या खोलीत गेल्यावर श्रावणधारांसारखी कोसळली ! वादळात सांपड-लेल्या केळीसारखी थरथरत होती—

" कुत्र्याचं शेपूट सरळ करते आहे म्हणत होता ना तुम्ही सर्व ? जिकले मीच शेवटी– पण मिळालं काहीच नाही ग ! त्यापेक्षा हरले असते तरी बरं झालं असतं ! "

तिला शान्त करण्याचा यत्न मी केला नाही. आवेगाने खळखळणारा प्रवाह निष्कारण कशाला थोपवायचा ?

पण अजूनही कधीकधी वाटतं––

नन्दूचं काही चुकलं का ?

□ □ □

# प्रक्षुब्ध अहमदाबाद

शाळा-कॉलेजे सुरू झाली आहेत. तासामध्ये थोडीफार कपात करून गिरण्यांच्या तिन्ही पाळ्या सुरू करण्यात आल्या आहेत. सरकारी व खाजगी कचेऱ्यांतील हजेरी समाधानकारक आहे. बुधवार दि. १७ सप्टेंबर ते रविवार दि. २१ सप्टेंबर पर्यंत अहमदाबादमध्ये झालेल्या हिंदु-मुस्लीम दंग्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत हळूहळू सुधारणा होत आहे.

---

गेल्या अंकात याविषयासंबंधीच्या निवडक मुलाखती दिल्या. येथे घटना आणि त्यावरील माणूस प्रतिनिधीचे विचार विस्ताराने दिले आहेत.

माणूस प्रतिनिधी : शरद कृष्णन्.

---

आवश्यकतेप्रमाणे लादण्यात आलेली संचारबंदी, मे. जनरल हजारे यांच्या नेतृत्वाखाली लष्कराने बजावलेली कामगिरी, केंद्रीय राखीव पोलीसदल, रेल्वे प्रोटेक्शन पोलीस आणि गुजराथची शासनयंत्रणा या सर्व शक्ती, हाती असलेल्या सर्व सत्तेचा वापर करून शांतता निर्माण करण्याचे कार्य करीत आहेत. विविध राजकीय पक्षांच्या वतीने संघटित करण्यात आलेली शांतता समिती आपल्या परीने प्रयत्न करीत आहे. अशा चौफेर प्रयत्नांना आलेले यश मात्र फार मर्यादित आहे.

अहमदाबाद, बडोदे, आनंद आणि नडियाद या दंगलग्रस्त भागातील चार प्रमुख केंद्रांना मी भेटी दिल्या, आणि माझी खात्री झाली की लष्करी आणि मुलकी सत्तेचा वापर करून शांतता प्रस्थापित करण्यात यश आले असले तरी परिस्थिती अद्यापी स्फोटक आहे

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या हिंदु-मुस्लीम दंगलींपैकी पार्श्वभूमी, व्याप्ती आणि परिणाम या सर्वच दृष्टीने अहमदा-

बाद दंगल ही अभूतपूर्व समजावी लागेल.

दंगलीचे मुख्य केंद्र अहमदाबाद. सर्वसाधारणपणे भारत-पाकिस्तान संघर्षापासून वातावरण गढूळ होऊ लागले होते. दैनंदिन व्यवहार आणि व्यवसायिक संबंध यामुळे आवश्यक ठरणारा संपर्क सोडल्यास हिंदु-मुसलमान या दोन्ही बाजू हात राखून होत्या. या पार्श्वभूमीवर घडलेल्या तीन चार सलग घटनांनी वातावरण तापत गेले आणि दंगलीला तोंड फुटले

११ मार्च १९६९ : कालूपूर हा बहुसंख्य मुसलमान असलेला भाग. या भागात एक मुसलमान हातगाडीवाला रस्त्यावर गाडी उभी करून पुस्तकांची विक्री करीत असे. त्याने गाडी कडेला उभी करावी अशी अनेक वेळा सूचना करूनही सतत दुर्लक्ष झाल्याने त्या विभागातील पोलिस इन्स्पेक्टर एस्. आर. देसाई यांनी दोन पोलिस-कॉन्स्टेबलच्या सहकार्याने हातगाडी बाजूला नेली. गाडीवाल्याकडून काहीसा विरोध झाल्याने गाडीला धक्का लागून गाडीवरील पुस्तके खाली पडली. त्यामध्ये कुराण व काही मुस्लिम धार्मिक ग्रंथ असल्याचा कांगावा करून ७००–८०० मुसलमानांच्या संघटित जमावाने पोलिसांवर हल्ला केला. खात्यातर्फे या प्रकाराची जाहीर माफी मागण्यात आली.

एप्रिल १९६९ : अहमदाबाद कॉर्पोरेशनच्या निवडणुकीचा हा महिना. प्रस्थापित कॉर्पोरेशनमध्ये जनता परिषदेचे बहुमत होते. कोणत्याही परिस्थितीत जनता परिषदेला सत्तेपासून दूर करण्याचा निश्चय काँग्रेसवाल्यांनी योजिला होता. शहर काँग्रेसचे अध्यक्ष श्री. जमनाशंकर पंड्या निवडणुकीत विशेष लक्ष घालीत होते. परिणामांची तमा न बाळगता केवळ मतांच्या मोहामुळे अनेक धोकादायक मुसलमानांना जवळ करण्यात आले व त्यांना सवलती देण्यात येऊन त्यांच्या अनेक समाज – विघातक कृत्यांवर पांघरूण घालण्यात आले. मुसलमानांच्या या लांगूलचालनामुळे बहुसंख्य समाजात चिरड निर्माण होत होती. त्याकडे दुर्लक्ष करून ही सौदेबाजी करण्यात आली. निवडणुकींच्या मर्यादित अर्थाने सौदा यशस्वी ठरला व स्थानिक राजकारणात सत्तेपासून दूर असलेली काँग्रेस पुन्हा सत्ताधिष्ठित झाली. काँग्रेसचा विजय हा आपलाच विजय असल्याच्या भावनेने मुसलमानांतील कडवे जातीयवादी अधिक आक्रमक बनले. ही गोष्ट बहुसंख्याकांना मानवली नाही आणि हिंदु-मुस्लीम तेढ वाढीस लागल्याचे अधिक प्रकर्षाने जाणवू लागले. बारीक-सारीक कुरापतींनी ही सुरुवात झाली. मुसलमानांचे धोरण अधिक आक्रमक बनले व या आक्रमक प्रवृत्तीचे प्रदर्शन करण्याची संधी त्यांना चालून आली.

३१ ऑगस्ट १९६९ : अल् – अक्सा मशीद जळित प्रकरणाचे पडसाद भारतात सर्वत्र उमटू लागले होते. या प्रकरणी अहमदाबादमधील मुसलमानांची प्रक्रिया विशेष तीव्र असल्याचे दिसून आले. धार्मिक भावना दुखावल्या गेल्यामुळे जी प्रतिक्रिया अपेक्षित होती त्यापेक्षा अगदी वेगळे स्वरूप अहमदाबादमध्ये पहावयास

मिळाले. ३१ ऑगस्ट रोजी स्थानिक मुसलमानांनी — विशेषत: त्यांतील कडव्या जातीयवाद्यांनी एक प्रचंड मिरवणूक काढली. या मिरवणुकीत 'जो इस्लामसे टकराएगा वो मिट्टीमे मिल जाअेगा, पाकिस्तान — झिंदाबाद, मुस्लीमसे निभाना आसान नही,' यासारख्या घोषणा उघडपणे दिल्या गेल्या. शासनाकडून कारवाईची गोष्ट तर सोडाच; परंतु या गभीर बाबीची साधी दखलही घेतली न गेल्याने हिंदु मनातील अस्वस्थता वाढीस लागली.

४ सप्टेंबर १९६९ : दिवस जन्माष्टमीचा. हिंदूंचे अनेक धार्मिक समारंभ विविध ठिकाणी चालू होते. बहरामपुरा या भागातील एका देवळात सेवकराम ठक्कर यांचे कीर्तन ऐन रंगात आले होते. श्रोतृवृंद कृष्णजन्माची कथा ऐकण्यात रंगून गेला होता. देवळाबाहेर उभ्या असलेल्या मोठ्या समाजाची सोय ध्वनिक्षेपका-द्वारे करण्यात आली होती. या सुमारास पोलिस इन्स्पेक्टर खान आपल्या संपूर्ण गणवेषात देवळात आले, व कीर्तन बंद करण्याची आज्ञा सोडण्यात आली. प्रश्नोत्तरे होण्यापूर्वीच खानसाहेबांनी शेकडो लोकांच्या उपस्थितीत पोथीला लाथ मारली, लाऊड-स्पीकर बंद करवला व आपल्या पोलिसी थाटात आपल्या लवाजम्यासह खानसाहेबांची स्वारी निघून गेली. शांतताप्रिय हिंदुसमाज विखुरला गेला. झाल्या प्रकाराची बोच कीर्तनकार सेवकरामजी यांच्या मनाला लागून राहिली. या प्रकाराची चौकशी करावी असा विनंती अर्ज त्यांनी दाखल केला. मुसलमानांच्या तक्रारीच्या संदर्भात जागरुकतेने हालचाली करणारे शासन बुवांच्या अर्जाची दखल घेण्यास तयार नव्हते. बुवाही हट्टाला पेटले व त्यातून 'हिंदु धर्म रक्षा समिती'ची स्थापना झाली. हरिश्चंद्र पांचाल यांच्यासारख्या उत्साही कार्यकर्त्याने याबाबत पुढाकार घेतला. या संदर्भात न्याय न मिळाल्यास आपण आमरण उपोषण करू अशी घोषणा सेवकरामजींनी ११ सप्टेंबर रोजी केली. पाठिंब्यासाठी १३ तारखेला जाहीर सभा घेण्यात आली व १४ तारखेला 'अहमदाबाद बंद' या घोषणेचा पुकारा देण्यात आला. परिस्थितीचे गांभीर्य सरकारला थोडेसे जाणवले पोलिस — इन्स्पेक्टर खान यांना सस्पेंड करण्यात आले आणि त्यानंतर बुवांनी उपोषण सोडले. आपला विजय साजरा करण्यासाठी हिंदूनी मिरवणूक काढली. ७०—७५ हजारांच्या हिंदु जमावाने एकत्र येऊन धार्मिक संदर्भात आपल्यावर झालेल्या अन्यायाचे निराकारण झाल्या-बद्दल आनद प्रदर्शित करावा ही घटनाही अहमदाबादला नवीन होती.

हिंदु-मुसलमानांचे मोर्चे बांधले जात होते. वातावरणातील तीव्रता जाणवू लागली होती. केंद्रीय गृहखात्याने वातावरण तापत असल्याचे राज्यसरकारला कळवले होते. परंतु अद्यापही झालेले प्रकार किरकोळ स्वरूपाचे असून तात्पुरत्या तडजोडीने वातावरण निवळेल असाच शासनाचा दृष्टिकोन होता.

१८ सप्टेंबर १९६९ : मुस्लीम बहुसंख्या असलेल्या विभागात जगन्नाथ मंदिर व आश्रम आहे. या मंदिरावर गुजरात येथील ठाकोर तसेच अन्य काही कनिष्ठ

जमातीतील मंडळींची विलक्षण श्रद्धा आहे. मंदिरात नियमितपणे अन्नदान होते, गोरक्षणाचे कार्यही चालते. १८ सप्टेंबर रोजी मंदिरातील गायी साधु मंदिराकडे घेऊन येत होते. वाटेत मुसलमानांचा उरूस भरला होता. स्वाभाविकपणे रस्त्यावर गर्दी होती. गर्दीतून वाट काढत जात असताना एका गायीने मुसलमानास ढुशी मारली. थोडीफार बाचाबाचीही झाली व वातावरण चिघळले. तथापी संघर्ष टाळून साधुमंडळी परत आली. पण कल्पना नसताना अचानकपणे मुसलमानांच्या मोठ्या जमावाने मंदिरावर हल्ला केला. प्रत्यक्ष नुकसान फारसे झाले नाही तरी या हल्ल्याची बातमी वाऱ्यासारखी चौफेर पसरली व हिंदु-मुसलमानांच्या स्वातंत्र्यो-त्तर काळांतील अभूतपूर्व दंगलीला तोंड फुटले.

गुरुवारी सुरू झालेल्या दंगलीने शुक्रवारी व्यापक स्वरूप धारण केले. नवरंग-पूरा, उस्मानपूरा, वडेज या भागातही दंगलीचे लोण पसरले. गुरुवारच्या दंगली-मध्ये तीन लोक ठार झाले. जमालपूर, खडीया कालूपूर, दर्यापूर भागातून कत्तलीला सुरुवात झाली. शुक्रवार दि. १९ रोजी मुख्यमंत्री हितेंद्रभाई यांच्या घरी मंत्रीमंडळाची तातडीची बैठक घेण्यात आली. राखीव पोलीस बोलावण्यात आले. मिर्झापूर, खलीदा, गांधीरोड या भागात दंगल पसरल्याचे वृत्त आल्याने पोलीसांनी मोर्चे तिकडे वळवले. शनिवार दि. २० सप्टेंबर रोजी शाळा–कॉलेजें, बाजारपेठा, सिनेमागृहे, सरकारी व खाजगी कचेऱ्या, गिरण्या यातील व्यवहार अनधिकृतपणे परंतु संपूर्णपणे बंद होते. त्यातच जगन्नाथ मंदिराचे महंत सेवादासजी यांनी उपोषण सुरू केल्याने परिस्थिती चिघळली. अहमदाबादचे लीग माइंडेड मुस्लीम नेते ए. एम्. पीरजादा यांच्या नेतृत्वाखाली १५ जणांचे शिष्टमंडळ महंतजीना भेटले व झाल्या प्रकाराबद्दल त्यांनी दिलगीरी व्यक्त केली. पण कशाचाच परिणाम होत नव्हता. लुटालूट, चाकूमारीचे प्रकार वाढत होते.

शुक्रवार दि. १९ सप्टेंबर ते रविवार दि. २१ सप्टेंबर या ७२ तासातच दंगलीचे खरे महाभारत घडले. काय होते आहे हे कळण्यापूर्वीच अहमदाबादच्या उपनगरातून दंगलीने अखेरचे पर्व गाठले होते. मृतांची संख्या वाढत होती. आकडे फुगवून जाहीर होत होते. विपरीत वृत्त पद्धतशीरपणे पसरवले जात होते. दर ५ मिनिटाला एक अफवा कुठे तरी निर्माण होत होती, आणि तिखटमीठ लावले जाऊन पुढे सरकवली जात होती. त्यामुळे वातावरण जास्त प्रक्षुब्ध होत होते आणि परिस्थिती आटोक्याबाहेर जात होती. या काळात शांतता प्रस्थापनेसाठी झालेले प्रयत्न अतिशय दुय्यम स्वरूपाचे होते.

अहमदाबादचे महापौर नरोत्तम झव्हेरी यांनी शनिवार दि. २० रोजी सर्व-पक्षीय नेत्यांची बैठक बोलावली. परंतु प्रतिसाद मिळाला नाही. त्या आधी शुक्रवार दि. १९ रोजी शंभु महाराज, ए. एम्. पीरजादा, इंदूलाल याज्ञीक, खावामीन कादी, वसंत गजेंद्रगडकर, डॉ. मोमीन यांनी एक पत्रक काढून जनतेला

शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री हितेंद्रभाई देसाई यांनी रेडिओवर भाषण करून गजरायची परंपरा सांगून आयुष्यभर अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या पू. बापूंची आठवण करून शांती-संदेश दिला. परंतु 'जंग' करण्यास उत्सुक असलेली जनता शांती-संदेश ऐकण्याऱ्या मन:स्थितीत नव्हती.

शनिवार दि. ३० रोजी लष्कर आणल्याची वार्ता पसरली. परंतु त्यापूर्वीच दंगलीने अहमदाबादच्या मर्यादा ओलांडल्या होत्या. बडोदे, आनंद, नडीयाद येथे दंगलीचे लोण पसरले होते. वरीलपैकी प्रत्येक शहरी गोळीबार करावा लागला. आता मात्र शासनाची खात्री पटली की प्रकरण आपल्या आवाक्याबाहेरचे आहे. रविवारी दि. २१ रोजी लष्कराने शहराच्या पूर्व भागाचा ताबा घेतला. त्यामध्ये खोखाराम, मेहमदाबाद, सरसपूर, अमखा यांचा समावेष होता. लष्कर येऊनही परिस्थिती आवरत नव्हती. गिरणभागातील एका मुसलमानाने आपल्या घरातून गोळीबार करून चार माणसांना ठार केले व अनेकांना जखमी केले. शनिवार व रविवार विशेषत: रविवार दुपारपर्यंत जाळपोळीचे प्रमाण मोठे होते. शनिवार व रविवार या दोन दिवसात फायर ब्रिगेडला गेल्या पाच वर्षात करावे लागले नाही इतके काम करावे लागले. या काळात २४ तास खपणाऱ्या या दलाने दोनशेपेक्षा अधिक 'कॉल्स'ची दखल घेतली. रविवारपासून कर्फ्यू अंमल अधिक कठोर करण्यात आला आणि मग जी सक्तीची शांतता निर्माण झाली त्यामुळे गेल्या ७२ तासात शहरात किती प्रचंड हानी झाली याची कल्पना आली. प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेतलेल्या या हानीची माहिती हवीय ? ही घ्या.

## विषारी प्रचार

अहमदाबादमधील दंगलीच्या वृत्तांच्या आधारे विषारी प्रचाराची आघाडीच पाकिस्तान रेडिओने उघडली होती. सलग सात आठ दिवस मी त्यांची वार्तापत्रे ऐकली. त्यातील एक नमुना–

"अहमदाबादमे लगी हुई ये आग अभी तक बझी नही है। गांधीजी की जन्मशताब्दीपर अहमदाबादके ये हिन्दू उन्हे लाशोका तोफा नजर कर रहे है। ऐसी कर्तुदोसे हिन्दूस्थानको तबाही होनेवाले है। कई मुसलमानोको बेहरमीसे मौतके घाट उतारा गया है। मुस्लीमो को की जो हमेशा वफादार है, खाम खा मारा जा रहा है। अब ये अत्याचार मुसलमान नही सह सकते ! सडको पर बिछडो हुई ओनलाशो का बदला लेने की जिम्मेदारी अब मुस्लीम जनतापर आ पडी हैं ! अपनी जिम्मेदारी मुस्लीम अच्छी तरहसे समालेंगे ऐसी हमे उम्मीद है। इत्यादी—

या काळात सुमारे पंधराशे लोक-त्यातील कित्येक निरपराध—मारले गेले. गुन्हा ? गुन्हा एकच—हिन्दु किंवा मुसलमान असणे. स्त्री-पुरुष, लहान-मोठा, असे किरकोळ भेदभाव मानले गेले नाहीत. धर्म पाहून शस्त्र चालवले गेले. त्याचे सगळ्यात भेसूर प्रत्यंतर साबरमतीजवळ असलेल्या राणीप या खेड्यात पहावयास मिळाले. हा भाग बकरामंडी म्हणूनही ओळखला जातो. मेंढ्या—बकऱ्यांची विक्री करण्याच्या उद्देशाने अनेक मुसलमान या भागात येतात. काहींची घरेही या भागात आहेत. शनिवार दि. २० रोजी रात्री एका मोठ्या जमावाने या वस्तीवर हल्ला केला. सुमारे ६० मुसलमान कुटुंबं निर्वंश करण्यात आली. घर न् घर जमीनदोस्त करण्यात आले. अगदी नाही म्हटले तरी घरटी ५ माणसे धरून मृतांची संख्या कोणीही काढू शकते. मुसलमानांना सगळ्यात मोठा तडाखा बसला तो येथेच. त्याखालोखाल चमनपुरा, शहापूर, आसरवा, नरोडा रोड, बापू नगर, रखीयाल या भागात त्यांचे नुकसान झाल.

हिंदूंची हानीही अपरिमित झाली. त्यांचे नुकसान प्रामुख्याने मालमत्तेच्या स्वरूपात झाले. जीवितहानी त्यामानाने कमी झाली. लाल मिल भागातील एका भागातील एका कॉलनीत ३०–४० हिंदू मारले गेले. त्याचा बदला रखीयाल, गोमतीपूर, अमरेवाडी या भागात घेतला गेला. रविवारनंतरच्या घटना पहाण्यापूर्वी काही ठळक नोंदी देतो

मुस्लीम बहुसंख्य भागात देवळांवर छोटे हल्ले, किरकोळ दगडफेक झाली. शक्य झाले तेथे शस्त्रेही चालवण्यात आली हिंदुसमाजाला चिरड यावी असे अनेक प्रयत्न सहेतुक केले गेले. अर्थात असे प्रयत्न करणारांनाही हा गलथान समाज इतक्या आक्रमक स्वरूपात प्रतिकार करू शकेल याची कल्पना आली नाही. आणि परिणामी अतिशय केविलवाण्या परिस्थितीत पीरजादा, डॉ. मोमीन यांच्यासारख्या कडव्यांनाही शांततेची ललकारी पुकारावी लागली. आपल्या समाजाच्या झालेल्या अपरिमित हानीतून हे शांतीप्रेम उफाळले होते; परंतु शांती निर्माण होण्यापूर्वी दोन्ही जमातींचे भरपूर नुकसान होऊन गेले होते.

मुसलमानांना या हानीची कल्पना नव्हती तर हिंदू या दंगलीत त्यांच्या इच्छेविरुद्ध मुसलमानांच्या आक्रमक चालीमुळे आणि शासनाच्या गलथानपणामुळे ढकलले गेले. ' सेवक 'सारख्या दैनिकाने दिलेल्या एकांगी वृत्तांचा प्रतिकूल परिणाम झाला. शहराचा मध्यमर्ती भाग काहीसा सोडल्यास जातीय दंगलीच्या या भीषण हत्याकांडाने शहराच्या सर्व उपनगरातून नंगा नाच घातला. भारतीय रेल्वे हे तर कोणत्याही दंगलीचे खास टार्गेट. याही दंगलीत भारतीय रेल्वेला प्रसाद मिळाला. शनिवार दि. २० रोजी विरमगाव-मुंबई पॅसेंजर व बलसार लोकल, मणिनगर व मेहमदाबादमध्ये थांबवण्यात आल्या. याच दिवशी ४७ डाऊन बडोदे-विरमगाव गाडी शाहीबागजवळ ५०० च्या जमावाने थांबवली. दगडफक, लूट, हत्याकांड या

भयीचा पुन्हा प्रत्यय आला. सिग्नल रूम जाळण्याचाही प्रयत्न झाला.

रविवार दि. २१ च्या रात्रीपासून लष्कराने बंदुकीच्या जोरावर परिस्थितीवर कबजा मिळवण्यास सुरुवात केली. त्यांना हळूहळू यश येऊ लागले. पोलीस, कर्फ्यूला दाद न देणारी जनता लष्करी खाक्यापुढे नमू लागली. वृत्तपत्रांतील वार्तांमुळे परिस्थितीच्या गांभीर्याची कल्पना सर्वांनाच आली होती. त्याआधी केंद्रीय गृहमंत्री आणि महामंत्री गुजराथच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क ठेऊन होते.

सोमवार दि. २२ रोजी गुजराथनो सर्वोच्च नेतो पितृतुल्य मुरारजीभाई (–इति मुख्यमंत्री हितुभाई) यांचे आगमन झाले. काही काम करण्याऐवजी विद्यापीठाच्या सुरक्षित कंपाऊंडमध्ये मुरारजीभाईंची उपोषणाला सुरुवात झाली. हिंदु–मुसलमान या दोन्ही बाजूंचा राग त्यांनी ओढवून घेतला.

बुधवार दि. २४ रोजी गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी अहमदाबादला धावती भेट दिली. प्रत्यक्ष दंगल शमली होती. मदतकार्य सुरू झाले होते. पुढेमागे प्रेसवाले व फोटोग्राफर, बरोबर लष्करी व मुलकी शिबंदी अशा बंदाबस्तात मदत केंद्रे आणि काही दंगलग्रस्त भाग यांची पाहणी करून दोन्ही जमातींना शांतीचे आवाहन करून साहेब परतले.

साहेबांनी भेट दिल्यामुळे असेल कदाचित पण महामंत्र्यांनाही अहमदाबादला भेट देणे आवश्यक वाटले. बाईंची भेट ही साहेबी थाटाचीच झाली. फरक एवढाच की त्यांनी पंतप्रधान निधीतून १ कोटी रुपयांची मदत जाहीर केली. जनसंघ, संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी आणि अन्य पक्षांच्या प्रमुख नेत्यांनीही 'प्रत्यक्ष पाहणीचे' कार्य केले. आणि कुणीही दुखावले जाणार नाही अशा बेताने, मोजून मापून तयार केलेली आपली निवेदने प्रसिद्ध केली. भेटायला आलेल्या मंडळींमध्ये त्यातल्यात्यात थोडेसे गाजले, ते तीन संसद सदस्यांचे प्रातिनिधीक मंडळ. चंद्रजीत यादव, चौधरी रणधीर सिंग आणि मौलाना सईद आझाद मदानी यांच्या या प्रति-

## रस्ता रुंदी

दंगलीच्या ऐन धामधुमीत रस्त्यावरील वहातुकीच्या आड येणारे अहमदाबाद-बडोद्यातील अनेक दर्गे–कबरी उध्वस्त करण्यात आल्या. देवळे हटवण्याची हालचाल तत्परतेने करणारे शासन दर्गा हलवण्याची वेळ आला म्हणजे गर्भगळीत होऊन जाई. दंगलखोरांनी बजावलेल्या या कामगिरीमुळे शासनाचे हे काम थोडे हलके झाले. दर्गे–कबरी हटवून तयार केलेल्या रस्त्यावरून येणाऱ्या मोटारींना याच विशिष्ट जागेवरून जाण्याचे आदेश दंगलखोरांनी दिले. आणि मुसलमानांसुद्धा सर्व मोटारवाल्यांनी त्याची अंमलबजावणी केली!

निधी मंडळाला म्हणे महामंत्र्यांनी 'डेप्यूट' केले होते. त्यामुळे त्यांची दखल घेतली गेली. गुजराथ प्रदेश जनसंघाचे चिटणीस श्री. वसंत गजेंद्रगडकर यांनी या प्रतिनिधी मंडळावरच हल्ला चढवला. त्याची या मंडळाने योग्य ती दखल घेतली. मंडळाने सरकारच्या निष्क्रियतेवर कडाडून हल्ला चढवला. तसेच दंगलीत सी. आय्. ए. चा व पाकिस्तानी हस्तकांचा हात असल्याचे जाहीर केले. या मंडळापैकी मौलाना सईद यांनी दंगा पूर्वनियोजीत असल्याचा व त्यामध्ये जनसघ-संघाचा हात असल्याचा आरोप केला. आपला तीन दिवसांचा दौरा संपवून मंडळ परत गेले.

गुरुवार दि. १८ सप्टेंबरपासून सुरू झालेली ही दगल रविवार दि. २१ पर्यंत प्रखर होती. त्या नंतर तिचे स्वरूप मवाळ होत गेले. एखाद दुसऱ्या तासाची मुदत वगळता पुढे चार दिवस सलग कर्फ्यू-मिलिटरी कर्फ्यू असल्याने मंडळी घरी राहिली. वातावरण निवळले आणि दि. २५ पासून अधिक सवलती देण्यात आल्या. कर्फ्यूही सैल करण्यात आली. मिलिटरी आणि कर्फ्यू असेपर्यंत उपोषण सोडणार नाही अशा निर्धाराने बसलेल्या मुरारजीभाईंना विचार बदलणे आवश्यक वाटू लागले. दोन ऑक्टोबरचा गांधी जन्मशताब्दीचा मुहूर्त निवडून आणि भरपूर प्रसिद्धीची योजना करून या दिवशी झालेल्या जाहीर सभेमध्ये कडेकोट पोलीस बदोबस्तात त्यांनी आपल्या उपोषणाची सांगता केली. आणि दुसऱ्या दिवशीपासून शाळा व कॉलेजे सुरू झाल्यावर प्रारंभी वर्णन केल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झाली.

## मदतकार्य

दगलग्रस्त भागाला भेट देण्याचे निश्चित केल्यावर अहमदाबादला अग्रहक्क मिळणे स्वाभाविक होते 'अहिंसा परमोऽधर्मः' मानणारा बापूंचा हा गुजराथ तसा शांतताप्रिय आणि अतिथ्यशील. हात उचलणे तसे त्याला न मानवणारे, न आवडणारे. सतरा वेळा वेरावळचे सोरटी सोमनाथाचे मंदिर तोडणाऱ्या हातांची दखल घेण्याऐवजी सतर वेळा मंदिर पुन्हा उभे करणारा हा समाज. मग हे घडले कसे? त्याचे उत्तर देणारी कारणपरंपरा लेखाच्या पहिल्या भागात दिलीच आहे. आता नोंद करणार आहे तो मी पहाणी केलेल्या भागाची आणि मला आढळलेल्या काही विशेष घटनांचो. अहमदाबादमध्ये दाखल होण्यापूर्वी साधारण परिस्थितीची कल्पना घतली होती. अफवा आणि ऐकीव माहिती यांचे भरपूर पीक असल्याची खात्री झाल्याने कोणतेही मत बनवण्यापूर्वी प्रत्येक बाबीची खात्री करून घेणे आवश्यक होते. त्या दृष्टीनेच दंगलग्रस्त भागाची भेट हा एक महत्त्वाचा मुद्दा होता.

ऐकले होते त्या मानाने शहरात फारच थोडे दिसत होते; परंतु उपनगरांचा फेरफटका मारीत असताना झालेल्या नुकसानीची आणि नुकसान करण्यामागे असलेल्या शक्तींच्या संघटित सामर्थ्याची कल्पना यऊ लागली. उस्मानपूरा भागातील गोकूळनगरमधून

हिंडत असताना स्थानिक मदतनीस सांगू लागला : इथे एक मशीद होती; आणि आता दिसत होते– एक छोटे गणरायाचे मंदिर! आळीतील चार-सहा पोरटी हौशीने पूजा-अर्चा करीत होती. मला तेथे पाहून एक गुजराथी गृहस्थ "केम भाई शूं छे" करत पुढे झाला. प्राथमिक बोलण्यात विश्वास संपादन केल्यावर त्याने सांगितले, की या मशिदीबाबत अनेक वर्षे वाद होता. येथे पूर्वी मंदिर होते असा हिंदूंचा दावा होता. संधी आली आणि मशिद उखडली गेली. आणि आत खरोखरच भग्नावस्थेतील गणेशाची मूर्ती सापडली. याच 'श्री' ची आज साग्रसंगीत स्थापना केली गेली होती. याच भागातील कॉमर्स हॉस्टेल हे मुसलमान विद्यार्थ्यांचे हॉस्टेल पूर्णपणे उध्वस्त केलेले व लुटलेले दिसले. येथून जवळच असलेल्या जुन्या मशिदीची अवस्थाही केविलवाणी दिसली. तीन बाजूंनी तोडलेली ही मशीद आपल्या एकमेव आधारावर उभी आहे.

वाडज भागात प्रामुख्याने दुकाने लुटलेली व जाळलेली दिसली गांधी आश्रमा-वर हल्ला करताना जमावाचे मुख्य लक्ष होते– गुलाम रसूल कुरेशी. त्यांच्यावरील हल्ल्याची आणि त्यातून झालेल्या बचावाची हकीगत दैनिकांतून विस्ताराने प्रसिद्ध झाली आहे. मी फक्त एकच नोंद करतो की अल् अक्सा मशिदीसाठी निघालेल्या मिरवणुकीमध्ये श्री. कुरेशी होते आणि त्याची दखल जमावाने घेतली. स्वस्तिक कॉलनीमधील त्यांच्या चिरंजीवांच्या बंगल्यावर जो हल्ला झाला त्यात त्यांचे बरेच नुकसान झाले. मी स्वत: ॲडव्होकेट कुरेशी यांना भेटलो. बंगल्यावर झालेल्या हल्ल्याची, आणि जमावापासून केलेल्या स्वत:च्या जिवंत सुटकेची हकीगत त्यांनी विस्ताराने सांगितली. या अनपेक्षित प्रकाराने त्यांच्या मनाला चांगलाच 'सग्मा' पोचलेला दिसला. बंगल्यावरील हल्ल्यात विद्यार्थ्यांचे प्रमाण फार मोठे

## परिपाठ, वहिवाट, हक्क.

बडोद्याचे एक जुने नेते हर्षद मेहता म्हणतात: बडोद्याच्या कोर्टात आज मी वीस वर्षे प्रॅक्टीस करतो आहे. पण एक नवीनच उपद्रव गेल्यावर्षीपासून सुरू झाला आहे. कोर्टाचा परिसर हा शांतता झोन: पण या भागात असलेल्या मशिदी लाऊडस्पीकर लावून गर्जना करीत आणि 'अल्ला हो अकबर'चा घोष ऐकवीत. तुम्ही म्हणणार तक्रार करा. होना ? केली. पण दखल कोण घेतो ? नाजुक जागेचे दुखणे. काल नसलेली गोष्ट अपवाद म्हणून केली जाते. कालांतराने तिचा परिपाठ होतो. परिपाठातून वहिवाट आणि वहिवाटीतून हक्काची निर्मिती होते असा मुसलमानांच्या संदर्भात तरी अनुभव आहे; परंतु तरीही आमच्या तक्रारींची दखल आमचेच लोक घेत नाहीत.

होते असे त्यांनी ठामपणे सांगितले. दंगा पूर्वनियोजित व संघटित असला पाहिजे अशी स्वतःची खात्री झाल्याचेही त्यांनी सांगितले. अहमदाबादमधील जीवनाशी आपण इतके एकरूप होऊन गेलो होतो की आपण मुस्लीम असल्याची जाणीव प्रथमच आपल्याला झाल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्याशी झालेल्या चर्चेच्या आधारे सरकार निष्क्रिय असल्याची आपली खात्री पटल्याचे सांगून ते म्हणाले: मुख्यमंत्र्यांना भेटल्यावर मी सांगितले होते की या दंगलीमध्ये विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात हात असल्याने एक तर त्यांची महाविद्यालये लगेच सुरू करावीत, त्यांना घरी तरी पाठवून द्यावे, किंवा त्यांच्यावर पोलिस खात्या-मार्फत कडक नियंत्रण ठेवावे; परंतु शासनाने यापैकी कोणतीच गोष्ट केली नाही. पोलिसांच्या दप्तरी नोंदलेल्या नामवंत गुंडांना ताबडतोब अटक करावी अशी सूचना मी केली होती. त्याची ही दखल घेतली गेली नाही; आणि विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांनी श्री. रसूल यांच्या उपस्थितीत योग्य त्या अधिकाऱ्यास सदर सूचना देऊनही अंमलबजावणी झाली नाही. तात्कालिक स्वरूपाची शांतता हवी असेल तर अल्पसंख्याकांच्या मनामध्ये पुन्हा विश्वास निर्माण करणे अत्यंत अगत्याचे असल्याचे त्यांनी सांगितले. बॅरीस्टर साहेबांनी हिंदु मुलीशी लग्न केल्यामुळे व त्यांच्या चारित्र्याबद्दल वेडेवाकडे ऐकू येत असल्याने जमावाचा त्यांच्यावर राग होता

साबरमती विभागातील राणीप–बकरामंडी हा सगळ्यात धोकादायक भाग. अगदी 'डेंजरऽनो डेंजर एरिया' – इति मार्गदर्शक. या भागातील मनुष्य व वित्तहानी मन विषण्ण करून टाकते. सुमारे २०० कुटुंबांची धुळधाण या भागात झाली आहे. त्याची माहिती लेखाच्या पूर्वार्धात आहेच. कालूगाव रेल्वे कॉलनीमध्ये-ही मोठ्या प्रमाणात हत्याकांड झाल्याचे स्पष्ट दिसून येते. शहापूर भागात जळून गेलेल्या मोटारीचे सांगाडे पहावयास मिळतात. तर टाकीसुद्धा जळून गेलेला एक पेट्रोल पंप पाहून अंगावर काटा उभा राहतो. याच भागात अनेक दुकानांची हानी झाल्याचे या दुकानांचे जळलेले सांगाडे सांगतात. आसरवा भागात हिंदूंचे नुकसान झाले असून काही चाळींचीही हानी करण्यात आली आहे. चमनपुरा भागातील प्रेते आता काढून टाकली असली तरी दहशत निर्माण करण्यासाठी तेथे स्त्री-पुरुष व मुले यांची पाच प्रेते टांगून ठेवली होती. प्रेते हलवली असली तरी लोंबत्या दोऱ्या घडल्या घटनेची साक्ष देत होत्या. नरोडा रोड विभागात आणि बापू नगर, रखीयाल विभागातही गिरण कामगार भरपूर. मार देण्यात आणि खाण्यात लोकांचा मोठा वाटा. शहरातील सिंधी मार्केटचे नुकसानही भरपूर झाल्याचे दिसले. बहरामपुरा भागातील कबाडी मार्केट उध्वस्त झालेले दिसले. गीता मंदिरा-जवळील झोपड्यांची पूर्ण नासधूस केलेली दिसली. नटराज थिएटर जवळील मेडीकल असोसिएशनच्या बिल्डिंगमध्ये के. जी. बास्तावाला यांच्या दुकानावर हल्ला झाला. दुकानातील सामान रस्त्यावर आणण्यात आले. या सामानात

असलेल्या एका टेबलामध्ये नोटांची पुडकी होती. पण आश्चर्य म्हणजे जमावाला नोटांचा मोह पडला नाही. सर्व समानाची साग्रसंगीत होळी करण्यात आली. शिमगा संपला असला तरी जळीताचे कवित्व आजही पहावयास मिळते. खडीआ, पंचकुवा, दर्यापूर, जमालपूर भागातही भरपूर नुकसान झाले आहे. एलीस ब्रीज, शाहीबाग, उस्मानपुरा या शहराच्या पॉश एरियाला दंगलीतून बचाव करून घेता आला नाही.

दगलीचे खरे स्वरूप शहर व भोवतालचा १५-२० मैलांचा परिसर पालथा घातल्यावरच लक्षात येते.

## बडोदे–आनंद

दंगलीचे लोण पसरलेल्या अन्य शहरांपैकी मी बडोदे, नडीयाद व आनंद या शहरांना भेट दिली. आनंदमधील दंगलीत विद्यार्थ्यांचा पुढाकार होता. तर नडीयादची जबाबदारी कडव्या पटेल जमातीवर टाकावी लागेल. बडोदे, नडीयाद आणि आनंद या तिन्ही ठिकाणच्या दंगलीचे स्वरूप प्रतिक्रियात्मक असल्याने स्वाभाविकपणे त्यांची तीव्रता कमी होती. बडोद्यामध्ये तर अशी दंगल होईल, असे कुणालाच वाटले नव्हते. जातीय दंगलीच्या दृष्टीने बडोदा कमालीचे सुरक्षित मानले जाते. तेथील अनेक स्थानिक नेत्यांनी या गोष्टीस दुजोरा दिला. तेथील विद्यार्थी नेता तिवारी याने मात्र या दंगलीमागे संघटित प्रयत्न असल्याचा आरोप केला. तथापी त्यात विशेष तथ्य आढळत नाही. हिंदूंच्या हल्यापासून मुसलमानांना संरक्षण दिल्यामुळे आपल्याला कसा त्रास सोसावा लागला याची माहिती बडोद्या-तील जुन्या पिढीतील एक विचारवंत श्री. भोगीलाल गांधी यांनी दिली. 'Muslim is always Muslim' असे आपण म्हणतो, परंतु जातीय विष अंगात भिनले तर

### असुरक्षितता

अहमदाबादच्या दंगलीची झळ ज्यांना आर्थिक दृष्ट्या अतिशय तीव्रतेने जाणवली अशांपैकी श्री. बास्तावाला एक. ते म्हणतात: अहमदाबादमध्ये दोन जातीय दंगली झाल्या. त्यांची कारणे आणि परिणाम दोन्ही तात्कालीक स्वरूपाचे होते; परंतु चालू दंगलीचे रंगरूप काही वेगळेच दिसते. आम्ही हयात-भर कष्ट करून उभारलेली मालमत्ता क्रुद्ध जमावाने काही तासातच नष्ट केली. ठीक झाले. झाले गेले विसरून आम्ही पुन्हा मार्गी लागू. असेच कष्ट करू आणि नवीन जिंदगी उभारू. पण पुन्हा असे झाल्यास काय? आमच्या मनातील ही असुरक्षिततेची भावना दूर झाल्याखेरीज रोजच्या जीवनात रस घेणे आम्हाला पूर्णपणे अशक्य आहे.

' Hindu is always Hindu ' असल्याचा प्रत्यय आला असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. आज मुसलमानांवर धर्माचा जबरदस्त पगडा असून त्यातून त्यांना बाहेर काढल्याखेरीज हिंदु-मुस्लीम सलोखा निर्माण होणे कठीण असल्याचे त्यांनी सांगितले. बडोद्यातील मुसलमान तसे सघटित आहेत. गोधरा येथे गेल्यावर्षी झालेल्या मुस्लीम कॉन्फरन्समध्ये मुसलमानांनी चार लग्ने अवश्य करावीत, व त्यातील निदान एक तरी हिंदु मुलीशी करावे, अशा आशयाचा ठराव पास झाल्याची माहिती श्री. तिवारी यांनी दिली. बडोद्याचे महापौर श्री. ठाकोरभाई पटेल तसेच शहर काँग्रेस अध्यक्ष श्री. चंद्रकांत मेहता यांची भेट घेतली असता परिस्थिती निवळत असल्याचे त्यांना सांगितले. मात्र दोन्ही जमातीत विश्वास निर्माण होण्यास अवधी लागेल असा त्यांनी खुलासा केला. त्याचा प्रत्ययही लगेच आला. ठाकोरभाईंना भेटण्यास एक सिंधी दांपत्य आले होते. जागा असूनही जागेच्या शोधात असलेले ! तक्रार एकच की शेजारपाजार मुसलमान आहे तेव्हा दुसरी एखादी जागा सांगा. दायमाकुमार हे बडोद्यातील मुस्लीम नेते. त्यांनी मशिदीतून केलेल्या गोळीबारात एक जखमी व एक ठार झाल्याने स्वारी सध्या तुरुंगात आहे. योग्य कारवाई चालू आहे.

बडोद्यामधील दंगलीमध्ये १०–१२ माणसे दंगलीत अथवा गोळीबारात मारली गेली असली तरी प्रामुख्याने नुकसान मालमत्तेचे व मशिदीचे झाले आहे. दुबाईवाला यांची तीन हॉटेल्स जाळली गेली. रिलाएबल वॉच कपनीचा जनतेने विश्वासघात केला. सौदागर यांची तीन कापडाची दुकाने लुटली गेली. बडोद्यातील या लुटालुटीमध्येही प्रामुख्याने तरुणांचा हात होता. दंगलीत ठार झालेल्या वसंत दातीर (वय २४) व महेंद्र पटेल (वय ३४) यांच्या मृत्युबद्दल आजही हळहळ व्यक्त होते. दातीर यांचे तर नुकतेच लग्न झाले होते, व त्यांना एक छोटा मुलगाही आहे. जुन्या पिढीतील एक कार्यकर्ते श्री. हर्षद मेहता यांची, तसेच स्वतंत्र पक्षीय आमदार श्री. सी. एम्. पारेख यांची मी भेट घेतली. दोघांनीही झाल्या प्रकाराची जबाबदारी प्रामुख्याने तरुणांवर टाकली. आणि ' मुसलमानांनी अधिक राष्ट्रीय दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे, त्यांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल साशंक असलेल्या हिंदु बहुसंख्याकांच्या मनात विश्वास निर्माण केला पाहिजे, ' असे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले.

दोन दिवसांच्या या दंगलीने बडोद्यात सुमारे १०-१२ लाख रुपयांच्या मालमत्तेचे तसेच कामगारांच्या रोजगाराच्या रूपाने सुमारे १॥ लाख रुपयांचे नुकसान झाले असावे असा अंदाज आहे. आनंद आणि नाडीयाद येथे हे प्रमाण त्याहीपेक्षा कमी आहे.

अहमदाबादमधील दंगल शमल्यावर सरकारने उघडलेल्या मदत केंद्रावर जेव्हा माणसांचा महापूर लोटला, तेव्हाच दंगलीने निर्माण झालेल्या परिस्थितीची व

त्यासाठी आवश्यक असलेल्या पुनर्वसन कार्याच्या व्याप्तीची कल्पना येऊ लागली. या मदत केंद्राचा ३२ हजार स्त्री-पुरुषांनी आश्रय घेतला. शांतता प्रस्थापित होऊ लागल्यावर ही संख्या हळूहळू घटत असून मी अहमदाबादमध्ये असेपर्यंत पाच हजार नागरिक या कॅम्पच्या आश्रयाला होते. पोलीस स्टेडीयमवर जो सगळयात मोठा कॅम्प होता तेथे एकावेळी १० ते १२ हजार नागरिकांची राहण्याची व्यवस्था केली होती. मदतीच्या अगदी प्राथमिक अवस्थेमध्ये भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. त्यासाठी ६,००० क्विंटल टन गहू, ४,००० तेलाचे डबे, २,५०० साखर पोती यांची व्यवस्था शासनाने केली. असमर्थ ठरले असले तरी मदत कार्य मात्र पुष्कळच समाधानकारकपणे चाललेले दिसले. मदतीसाठी विशेषत: अन्न, निवासाच्या दैनंदिन गरजांसाठी शासनावर अवलंबून असलेल्यांची संख्या सध्या केवळ ५ हजारपर्यंत असून या महिना अखेरपर्यंत हा प्रश्न सुटलेला असेल. शासनामार्फत १,००० झोपडया उभारण्याचे आश्वासन यापूर्वीच देण्यात आले आहे.

मदत केंद्रावर आश्रयासाठी आलेल्या लोकांमध्ये बहुसंख्य मुस्लीम होते. हिंदूसाठीही वेगळा कॅम्प करावा इतकी त्यांची संख्या मोठी होती हेही विसरून चालणार नाही.

मदत केंद्रावर वार्ताहर म्हणून उघड प्रवेश मिळवणे तसे त्रासदायक नसले तरी आवश्यक ती माहिती मिळवण्याच्या दृष्टीने खचितच त्रासदायक होते. स्वाभाविकपणे अधिकृत प्रवेश मिळवण्याऐवजी मी चोरून मारून हिंडणे, गप्पा मारत माहिती मिळवणे पसंत केले.

बाईचे नाव रोशनबाई. बरोबर एक सात आठ वर्षाची लहान मुलगी. आत्तापर्यंत वास्तव्य राणीप भागात. पुढे काय याची त्यांनाही कल्पना नाही. घरात माणसे एकूण ७. त्यातील ५—सर्व पुरुष माणसे दंगलीत कामी आली. नवरा इस्माइल बकऱ्या विकण्याचे काम करी. धाकटा दीर अबीद नोकरीमध्ये होता ९० रुपये मिळवी. सासरा म्हातारा असला तरी घराला आधार होता आणि शाळेत

## जातीय रक्त

दंगलीचा डोंब उसळल्यावर हॉस्पिटलमधील गर्दी वाढू लागली. जखमी झालेल्या अनेक नागरिकांना रक्ताची गरज निर्माण झाली. रक्तदानाचे आवाहन केले गेले. परंतु प्रतिसाद येईना. मेडीकल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाच या संदर्भात विचारणा करण्यात आली. उत्तर मिळाले: रक्त मिळेल! जरूर मिळेल, पण ते फक्त आमच्या जातीच्या रुग्णाइतांसाठीच. जातीयतेचे विष रक्तात किती खोलवर भिनले आहे याचा हा बोलका पुरावा.

जाणारी अली आणि महंमद ही दोन मुले होती. एका वादळी झंझावाताने पाचही जणांचे अस्तित्व नाहीसे झाले आहे. आता या दोघी पुढे काय करणार? उत्तर त्यांना स्वतःला वा अन्य कुणालाही सांगता येणार नाही.

भेटलेल्या १५–२० मंडळींपैकी प्रत्येकाजवळ स्वतःची दुःखे होती. त्यातील सगळ्यात मनाला जे भिडले ते नोंदवले. हो. आणखी तो छोटा शिवशंकर. असेल ७–८ वर्षांचा. वेडाच झालाय म्हणे. त्याच्या आज्याबरोबर अहमदाबादमध्ये रहात होता. वडील अधीच मेलेले. आजा पूर्वी गिरणीत काम करीत असे. ते काम सुटल्यावर कुल्फी विकण्याचे काम करी. मावस भावाची मुंज निघाली म्हणून शिवशंकर सुरेंद्रनगरला गेला. आला तर घरात आज्याचा मुडदा बघितला, आणि धसका घेतलान. मावशीच्या नवऱ्याने त्याला नेण्याचा प्रयत्न केला. पण हालत नाही. प्रत्येकाला विचारतो–मेरे बापूको देखा ?

मदत-केंद्रापेक्षाही हॉस्पिटलमधील दृश्य अधिक जीवघेणे होते. मी सरकारी सिव्हील हॉस्पिटल खेरीज वाडीलाल साराभाई, गुलाबभाई म्युनिसिपल हॉस्पिटल (सरसपूर) व गोवर्धन लळूभाई हॉस्पिटल (मणीनगर) या चार हॉस्पिटलस्ना भेट दिली. दंगलीने लादल्या गेलेल्या पेशन्टस्मुळे चारही हॉस्पिटल्स भरून गेली होती. वास्तविक ज्याच्यावर उपचार होणे आवश्यक असे अनेक रोगी जागा नसल्याने केवळ जुजबी उपचार करून घेऊन हकलले जात होते. हॉस्पिटलमध्ये गेल्या १५ दिवसात (म्हणजे दि. २० सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर) दंगलीतील कमीतकमी २०० जखमी मृत्यू पावले असल्याची माहिती डॉ. शहा यांनी सांगितली. जखमी मंडळी दंगलीसंबंधी बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हती. त्यातही ज्या मंडळींशी बातचीत करू शकलो त्यांच्या मनात बदला घेण्याची ईर्षा दिसून आली. स्वतःच्या यातनांबरोबरच भोवताली घडणाऱ्या घटना ते उघड्या डोळ्यांनी पहात होते. कदाचित् त्याचाही हा परिणाम असावा.

## आर्थिक हानीचा अंदाज

चार दिवसांची दंगल. परंतु केवढी जबरदस्त हानी करून गेलीय. काही कल्पना ? छेः तशी नाही येणार. स्वतः हिंडून खात्री करून घेतलेली माहिती सांगतो म्हणजे कल्पना येईल.

अहमदाबादचा सगळ्यात मोठा व्यवसाय कापड गिरण्या. अहमदाबादच्या ६४ कापडगिरण्यांपैकी बहुसंख्य गिरण्या एक आठवड्यापेक्षा जास्त काळ बंद होत्या. देशाच्या एकुण मासिक सुती कापडाच्या २० टक्के उत्पादन या कापड गिरण्यात होते. दंगलीमधील काळात चारपांच कोटी रुपयांचे उत्पादनास देश मुकला. रोजगाराच्या रूपाने मजुरांना मिळणाऱ्या रकमेपैकी १ कोटी रुपयांचे नुकसान मजुरवर्गाला सोसावे लागले.

लहान स्वरूपाचे उद्योगधंदे म्हणता येतील असे सुमारे तीन हजार उद्योगधंदे अहमदाबादमध्ये आहेत. त्यांचे सुमारे एक कोटी रुपयांचे व या क्षेत्रात असलेल्या कामगारांचे सरासरी चौदा लाख रुपयांचे नुकसान झाले.

अती छोटे उद्योग व दुकाने यांची संख्या एक लक्ष पसतीस हजार असून सुमारे पंचेचाळीस हजार कामगार या धंद्यात आहेत. अक्षरशः हातावर पोटे असलेला हा वर्ग. रोज सरासरी चार पाच रुपये मिळवणारा. दंगलकाळात उपाशी पोटी राहिलेल्या या कामगारांना सात लाख रुपयांच्या रोजगाराला मुकावे लागले.

अहमदाबाद शहर बस सर्व्हिसला दंगलकाळामध्ये रोज बावीस ते पंचवीस हजार रुपयांच्या निव्वळ उत्पन्नाला मुकावे लागले; तर राज्य सरकारच्या नागरी वाहतूक मंडळाचे रोज साडेबारा हजार रुपयांचे निव्वळ उत्पन्न गमवावे लागले. राज्य सरकारचे एक्साइज कराचे तीस लाख रुपयांचे व करमणूक कराचे अडीच लाख रुपयांचे उत्पन्न बुडले. अहमदाबादमधील थिएटरवाल्यांचे नुकसान तर अजूनही चालूच आहे. कारण कर्फ्यू उठला असला तरीही थिएटर्समधील उपस्थिती नगण्य असते. या संदर्भात नटराज थिएटर्सच्या व्यवस्थापकांना भेटलो असता त्यांनी सरासरी उपस्थितीचे प्रमाण सुमारे साठ टक्क्याने घटले असून वातावरण पूर्ण निवळेपर्यंत रात्रीच्या खेळाला नियमित उपस्थितीची अपेक्षा करणे योग्य ठरणार नसल्याचे सांगितले. आतापर्यंत व्यवसायाचे कमीत कमी बावीस लाखाचे नुकसान झाले असून अस्थिर वातावरणामुळे नवीन चित्रपट मिळणे कठीण जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

खाजगी क्षेत्रामध्ये फायनान्स कॉर्पोरेशनमार्फत १॥ लाख रुपयांपर्यंतची कर्जे देण्यात येणार असून काही निवडक बाबतीत कर्जाची शाश्वती शासन घेणार असल्याचे समजते. मालमत्तेच्या नुकसानीचा निश्चित अंदाज बांधण्यात आला

## पानशेत

अहमदाबादच्या परिसरात अफवांचे पीक जबरदस्त आले होते तेव्हाची गोष्ट. दंगल आटोक्यात आली होती. कर्फ्यू काहीसा सैल करण्यात आला होता. घरात कोंडून राहिलेले नागरिक आवश्यक चीजवस्तू खरेदी करण्यासाठी बाहेर पडले होते आणि हूल उठली — मारामारी. भोसकाभोसकी सुरू झाली. एक पळाला, दुसरा पळाला...आणि मग सगळेच पळू लागले. थेट घराच्या दिशेने. दहा मिनिटांनी मिलिटरी गाड्या फिरवून अफवेच्या संदर्भात खुलासा केला गेला. पण शंकेने ग्रासलले नागरिक पुन्हा घर सोडण्यास तयार होईनात. मला आठवण झाली ती पुण्याचे पानशेत फुटल्यानंतर उठलेल्या अफवेची. प्रसंग वेगळे पण मानवी मनाची प्रतिक्रिया एकच.

नसला तरी तक्रार असलेल्या प्रत्येक केसची चाचणी करून मालमत्ता-हानीचे प्रमाण ठरवण्याची जबाबदारी लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनवर सोपवण्यात आली आहे. छोटया व्यापाऱ्यांना वैयक्तिक हमीवर पाच हजार रुपयांपर्यंतची कर्जे मंजूर करण्यात येणार आहेत. हे उपाय योजले गेल्यावर आर्थिक हानीतील तणाव केवळ पाच टक्क्याने कमी होईल, असे मत गुजराथ चेंबर ऑफ कामर्स अॅन्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. अरविंद नरोत्तम लालभाई यांनी माझ्याजवळ व्यक्त केले.

राज्याच्या आर्थिक व्यवहारात अनेक मुसलमान कुटुंबांना महत्त्वाचे स्थान आहे. शासनाशी तसेच अनेक हिंदु व्यापाऱ्यांशी त्यांचे रोजचे संबंध आहेत. वातावरण संशयाचे असेपर्यंत या संबंधात पूर्वीचा सलोखा निर्माण होणे अतिशय अवघड आहे. शाळा महाविद्यालयातूनही जातीय मलोख्याचा हा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. अनेक मुसलमान विद्यार्थ्यांना आपल्या हिंदु वर्गमित्रांकडून झळ पोचली आहे; आणि तिची तीव्रता इतकी आहे की, अहमदाबादपुरते बोलायचे झाल्यास मुसलमान विद्यार्थ्यांना पुरेशी सुरक्षितता वाटत नाही.

वातावरणातील तीव्रता कमी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा विषय निघाला म्हणून सांगतो, अहमदाबादमधील दंगलीत विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणावर भाग घेतला होता. याची कबुली शिक्षणक्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी दिली. गुजराथ विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री. उमाशंकर जोशी मात्र त्याला अपवाद होते. अहमदाबाद येथील सेंट झेवीअर्स कॉलेजचे उपप्राचार्य फादर डायस यांना मी भेटलो. त्यांच्या महाविद्यालयातील तीन मुसलमान विद्यार्थ्यांना दंगलीची झळ पोचल्याचे त्यांनी सांगितले. गावातील दंगलीमध्येही विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणावर भाग घेतल्याचे त्यांनी मान्य केले. बहुसंख्य विद्यार्थ्यांना आपली चूक उमगली असून त्यांनी आपल्या मुस्लीम सहाध्यायांचे केलेले नुकसान भरून देण्याचे साम्य केले आहे. कै दादासाहेब मावळंकर यांचे चिरंजीव प्राचार्य पी. जी. मावळंकर यांनीही विद्यार्थ्यांमधील हा नवीन बदल नोंदवला.

## पार्श्वभूमी

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये अगदी ब्रिटीश सत्तेपूर्वीच्या काळात डोकावले तर गुजराथमध्य मुसलमानी सत्तेचा अंमल चांगला रुजल्याचे स्पष्ट दिसून यते. व्यापार-उदीमात रंगलेल्या गुजराथी जनतेला या काळात तरी राजकीय गुलामगिरीची तीव्रता जाणवली नाही. व्यापार-उदीमातील त्यांच्या लौकीकामुळे स्वराज्याच शिंग फुंकणाऱ्या छत्रपतींनाही आर्थिक गरजेपोटी सुरतेवर डोळे वटारावे लागले. महाराष्ट्र आणि गुजराथ यांच्या संबंधातील महत्त्वाचा दुवा म्हणजे बडोद्याची गायकवाडी. मराठी अमलाखाली असलेल्या या प्रदेशामुळे महाराष्ट्र-गुजराथ जवळ आले. मुंबईच्या व्यापारी महत्त्वामुळे त्यांच्यामधील ही जवळीक वाढली. पुढे ब्रिटीश

साम्राज्य आले. भारतीयांनी या सत्तेविरुद्ध रणशिंग फुंकल्यावर मात्र त्याला गुजराथमध्ये प्रतिसाद मिळाला. भिन्न विचार आणि भिन्न व्यक्तिमत्त्व असूनही भारतीय राजकारणात स्वतःचा ठसा उमटवून गेलेले महात्मा गांधी आणि सरदार पटेल हे दोन थोर नेते गुजराथने देशाला दिले. महात्माजींचें तत्त्वज्ञान गुजराथला मानवणारे. तर सरदार महाराष्ट्राला जवळचे.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. भाषिक राज्यांची मागणी करण्यात आली. ऐतिहासिक संघर्षातून जाऊन सौराष्ट्रापासून सर्व गुजराथी भाषिकांना एकत्र आणणारे गुजराथ राज्य तयार झाले. महात्माजींच्या तत्त्वज्ञानाचा विलक्षण प्रभाव गुजराथी मनावर असल्याने स्वतंत्र अस्तित्व मिळूनही गुजराथने आपली 'इमेज' कायम राखली.

स्वतंत्र गुजराथमध्येही काँग्रेसचे वर्चस्व कायम राखले गेले. जिवराजभाई मेहता गुजराथचे पहिले मुख्यमंत्री झाले. मुरारजीभाईंच्या महत्त्वाकांक्षी राजकारणाने त्यांचा बळी घेतला. त्यांच्या जागी आलेले बळवंतराय भारत-पाक संघर्षाचे वेळी विमान अपघातात (?) मारले गेले. आणि सत्तेची सूत्रे मुरारजीभाईंच्या मर्जीतील हितेंद्र देसाई यांच्याकडे आली. ६७ च्या निवडणुकीने देशाचे चित्र बदलून टाकले. गुजराथही त्याला अपवाद नव्हता. राजे-महाराजे, कारखानदार यांच्या आश्रयाने मद्रासच्या धूर्त चाणक्याने उभ्या केलेल्या स्वतंत्र पक्षाला गुजराथेत चांगले यश मिळाले. सत्तेचे मानकरी मात्र काँग्रेसवालेच ठरले. स्वतंत्र पक्षाला ना निश्चित तत्वज्ञान ना पक्षशिस्तीची कठोर बंधने. स्वाभाविकपणेच काँग्रेसने फेकलेल्या सत्तेच्या गुळाला यातील काही मुंगळे लगेच चिकटले आणि काँग्रेस मंत्रीमंडळाची अस्थिरता संपली. काँग्रेसला मत द्यायचे नाही असे ठरवल्यावर गुजराथी मते वळली ती स्वतंत्र पक्षाकडे. ही गोष्टही तेथील जनतेच्या राजकीय विचारसरणीवर प्रकाश टाकणारी आहे. जनसंघ, समाजवादी, डावे व उजवे कम्युनिस्ट यांची गुजराथमधील अवस्था नगण्य आहे; तर भाषिक राज्याचे भांडवल करून काही काळ जनमानसावर मोहिनी

## तिसरी जात

दंगलीचा प्रत्यक्ष अनुभव घतलेले एक गांधीवादी श्री. गुलाम रसुल कुरेशी यांचे दंगलीवरील एक भाष्य मोठे बोलके आहे. ते म्हणतात : हिंदूही नसलेली आणि मुस्लीमही नसलेली एक तिसरीच जमात या जातीय दंगलीत पहावयास मिळाली. या जमातीचे नाव लुटारूंची जमात. मुसलमानी हमल्यात ते हिंदू म्हणून सामील झाले. तर हिंदूंवर हल्ला करताना ते इस्लामचे पाईक म्हणून दाखल झाले.

चालणाऱ्या महागुजराथ जनता परिषदेची आजची अवस्था केविलवाणी आहे. पाच सात वर्षे अहमदाबाद महानगरपालिकेत सत्ता भोगणाऱ्या या जनता परिषदेला कॉंग्रेसने गेल्या एप्रीलमध्ये झालेल्या निवडणुकीत कुठल्या कुठे फेकून दिले आहे. एप्रीलमध्ये झालेल्या या निवडणुका जनता परिषदेने डाव्यांची एकजूट करून लढवल्या होत्या. जुन्या कॉर्पोरेशनमध्ये एस्. एस्. पी. चा आठ जागा होत्या त्या केवळ तीन उरल्या. कम्युनिस्टांची संख्या बारावरून तीनवर आली. प्रजासमाजवादी आपली ताकद संभाळून राहिले. स्वतंत्र पक्षाची चांगलीच घसरगुंडी उडाली. विशेषतः सार्वत्रिक निवडणुकीतील यशही कॉर्पोरेशन निवडणुकांचे वेळी उपयोगी पडू शकले नाही. जुन्या कार्पोरेशनमध्ये जनसंघाला एकही जागा नव्हती. एप्रीलमधील कॉर्पोरेशन निवडणुकीचे वेळी ५८ जागा लढवून जनसंघाने तीन जागा जिंकल्या. आणि कॉंग्रेसच्या खालोखाल एक लक्ष पस्तीस हजार मते मिळवली. अल्पसंख्याकांचे सर्व लाड पुरवून कॉंग्रेसने निर्विवाद बहुमत मिळवले खरे; परंतु मुस्लीमांबाबतचे हे बोटचेपे धोरण त्यांना महागात पडल. बडोदे महानगरपालिकेतही कॉंग्रेसचे निर्विवाद बहुमत आहे. ५१ जागा असलेल्या या महानगरपालिकेमध्ये पी. एस्. पी. ४, स्वतंत्र ४, सी. पी. आय्. (एम्.) १ व अपक्ष ६ असे इतर पक्षांचे संख्याबळ आहे.

असेंब्लीची सध्याची परिस्थिती कॉंग्रेसच्या हाती सत्ता राहण्याच्या दृष्टीने मजबूत आहे. १६८ सदस्य असलेल्या गुजराथ राज्य विधानसभेमध्ये कॉंग्रेसचे १०१, स्वतंत्र पक्षाचे ५५, एस्. एस्. पी. व जनसंघाचा प्रत्येकी १, प्रजासमाजवादी पक्षाचे ३ व अपक्ष ७ असे संख्याबळ आहे. निवडणुकीनंतर मिळालेल्या सत्तेमुळे कॉंग्रेसने स्वतंत्रांपैकी १० आमदार पळवले असून अधिक फाटाफुटीची शक्यता राजकोट मधून निवडून आलेले जनसंघीय आमदार श्री. चिमणभाई शुक्ला यांनी बोलून दाखवली. अहमदाबाद शहरातून विधानसभेच्या ८ जागा असून त्यातील कॉंग्रेसने ४, जनतापरिषदेने २ व अपक्षांनी २ जिंकल्या आहेत. लोकसभेच्या २ जागांपैकी खुली जागा जनता परिषदेचे इंदूलाल याज्ञिक यांनी जिंकली असून राखीव जागा सोमचंद मकवाना यांनी जिंकली आहे. बडोद्यात विधानसभेच्या ३ जागा असून त्यातील एक कॉंग्रेसचे महाराज फत्तेसिंह गायकवाड, दुसरी प्रजासमाजवादी पक्षाचे श्री. सनत मेहता व तिसरी स्वतंत्र पक्षाचे श्री. चंद्रकांत पारेख यांनी जिंकली आहे. लोकसभेची जागा स्वतंत्र पक्षाचे पाशाभाई पटेल यांनी कॉंग्रेसच्या नानाजी चोक्शी यांचा पराभव करून जिंकली आहे.

वरील नोंदीचा संगतवार अर्थ लावला तर जातीय प्रचार आणि पैसा या दोन गोष्टींवर गुजराथमधील निवडणुकीचे राजकारण चालते असे दिसून येईल. अनेक नेत्यांशी चर्चा केल्यावर माझेही तसेच मत बनले आहे. निवडणुकीत यशस्वी ठरण्यासाठी कॉंग्रेसने जातीयतेचा व स्वतंत्रपक्षाने पैशाचा भरपूर वापर केला असे दिसून येईल. सप्टेंबरमध्ये झालेल्या दंगलीची मुळे या निवडणुकीच्या राजकारणात खोल-

वर रुजलेली आहेत हे विसरून चालणार नाही. आणि जातीय विद्वेषाचा पुरस्कार करून कॉंग्रेसने सत्ता मिळवली असल्याने आणि याच गोष्टींचा अनुनय ७२ सालच्या निवडणुकीतही करावयाचा असल्याने कॉंग्रेसने जाणीवपूर्वक पोसलल्या या भस्मासुराने इतके उग्र स्वरूप धारण केले. लष्कर येईपर्यंत तरी शासनाचे धोरण सर्वसाधारण मवाळच होते. मुसलमानांच्या सततच्या अनुनयामुळे बहुसंख्य जमातीस प्रस्थापित सत्तेबद्दल आपलेपणा नाही. आणि कॉंग्रेसने कितीही गप्पा मारल्या तरी संकटकाळी आपले रक्षण करण्याचे सामर्थ्य या शासनात नाही असा मुसलमानांना अनुभव आल्याने सध्यातरी कॉंग्रेसची अवस्था 'न घरका न दारका' अशी झाली आहे. जातीय दंगल म्हटली की संघ–जनसंघाच्या नावाने ओरड करण्याची फॅशन पडली आहे. त्याचा प्रत्यय याही वेळेस आला; परंतु राज्य-विधानसभेमध्ये आणि अहमदाबाद, बडोदे येथील महानगरपालिकांतून या पक्षाची अवस्था किती केविलवाणी आहे हे वरील आकडेवारीवरून दाखवून दिले आहेच.

आता संघाकडे – आर. एस. एस्. कडे बघू. सर्वसाधारणपणे गुजराथमध्ये आर. एस्. एस्. चा जोर कमीच. अहमदाबादपुरते बोलायचे झाल्यास संघ स्वयंसेवकांची संख्या जेमतेम हजार-बाराशेच्या घरात आहे; आणि नियमित भरणाऱ्या शाखांची संख्या पन्नासच्या घरात आहे. काही विशेष कार्यक्रम असला तरी ३-३॥ हजार 'सहानुभुती दाखविणारे' हजर राहतात. बडोद्यात शाखांची संख्या २८ असून स्वयंसेवकांची संख्या ४०० च्या घरात आहे. त्यांच्या सामर्थ्याची ही कुवत पाहिली म्हणजे इच्छा असली तरी निदान स्वतःच्या सामर्थ्यावर तरी त्यांना एवढी जबरदस्त झेप घेणं मानवणार नाही, हे एखादा गावढळही सांगू शकेल.

दलित वर्गापैकी त्यातल्या त्यात संघटित वर्ग गिरण कामगारांचा. या कामगार संघटनेतही वर्चस्व बैलजोडीवाल्यांचेच. मजूर महाजन कॉंग्रेस ही सध्याची सगळ्यात प्रबळ संघटना. सुमारे ७५ ते ८० हजार कामगार या संघटनेचे सदस्य आहेत. स्वतंत्र गुजरात चळवळीमध्ये फोफावलेली संघटना म्हणजे जनता परिषद नियंत्रित महागुजराथ मिल मजदूर संघ. स्वतंत्र गुजराथ चळवळीचे वेळी या संघटनेची संख्या २५ हजाराचे घरात होती. पण महाराष्ट्र मिळाल्यावर संयुक्त महाराष्ट्र समितीचे बाळसे जसे लगेच ओसरले अगदी तशीच अवस्था गुजराथमध्ये जनता परिषदेची आणि पर्यायाने तिच्या या संघटनेची झाली. जनता परिषदेच्या झड्याखाली एकत्र आलेली निरनिराळ्या पक्षाची मंडळी आता स्वतःच्या स्वतंत्र संघटना बांधण्याच्या तयारीत आहेत.


या खेरीज पी. एस्. पी. वाल्यांची मिल मजदूर सभा तीन हजार गिरणकामगाराच्या ताकदीने उभी आहे. तर जुन्या रॉयीस्टवाल्यांचे मिल मजदूर मंडळ अस्तित्वापुरते टिकून आहे. याही क्षेत्रात कॉंग्रेसची आघाडी आहे.

राजकीय क्षेत्रात आज तरी ज्याचा प्रतिस्पर्धी म्हणून उल्लेख करावा, इतपत

ताकदीचा पक्षही काँग्रेससमोर उभा नाही ही वस्तुस्थिती आहे.

गुजराथमधील समाज हा बव्हंशी परंपराप्रिय, पापभिरू, धार्मिक प्रवृत्तीचा आणि नोकरी-धंद्यापेक्षा व्यापार-उदीमात रस घेऊन आर्थिक सामर्थ्य उभे करण्यात थोडी घेणारा. आज गुजराथमध्ये गुजराथी समाजाच्या खालोखाल महत्त्व असेल तर ते मुसलमान समाजास. या समाजात अत्यंत दरिद्री आणि अत्यंत संपन्न लोक पाहावयास मिळतात. देशाच्या इतर भागातील मुस्लिम समाज काहीसा तरी वेगळा भासतो. जाणीवपूर्वक स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याचा प्रयत्न करतो. गुजराथमध्ये तशी परिस्थिती निदान तितक्या प्रकर्षाने खचितच नव्हती. कदाचित् व्यापारामधील परस्पर सहकार्य त्याला कारणीभूत असेल. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात ' मताचे महत्त्व ' लक्षात येऊन हा समाज संघटित केला गेला. आणि त्यातही निश्चितपणे Bulk voting करणारा अशी ख्याती मिळाल्याने त्याचे महत्त्व आणि वेगळेपण वाढत गेले. लाड पुरवले जाऊ लागले. बारीक सारीक खोड्यांकडे दुर्लक्ष केले जाऊ लागले. आत्तापर्यंत माहीत नसलेल्या गर्जना होऊ लागल्या. मताची चिठ्ठी हातात असल्याने आपल्याला कोणी दुखवू शकणार नाही ही भावना बळावत गेली – तसा अनुभवही येऊ लागला; आणि समाजाचे वेगळेपण प्रस्थापित झाले. इतर पक्षांशी वेगळ्या व्यासपीठावरून बोलणी होऊ लागली. ताकद संघटितपणे वाढवली जाऊ लागली. दुसऱ्या राष्ट्राच्या नजीकच्या सरहद्दीकडे डोळे लागले. गुपचूप संदेश सुरू झाले. बहुसंख्य समाज अस्वस्थ झाला. बहुसंख्याकांमध्ये गुजराथी स्वाभाविकपणेच अधिक. त्या खालोखाल मराठी, भय्ये, पंजाबी, मद्रासी आदी अन्य हिंदु भारतीयांचा समावेश करावा लागेल. आपल्या न्याय्य गोष्टी नाकारल्या जातात आणि मुस्लीमांचे दोषही पोटात घालून लाड पुरवले जातात असें दाखले मिळू लागले. आणि असंघटित असलेला हा समाज राष्ट्रीयत्वाच्या आणि ज्ञातीबंधुत्वाच्या प्रखर नजरेने, घडणाऱ्या घटनेचे वेध घेऊ लागला.

## समाप्त



# चंद्रकांत

## एक निसर्गवेडा चित्रकार

वसंत सहस्रबुद्धे

चंद्रकांत हे नाव गेली तीस पस्तीस वर्षे मराठी चित्रपटरसिकांच्या अत्यंत परिचयाचे आहे. धिप्पाड, रेखीव व ऐटबाज व्यक्तिमत्त्वाचा हा अभिनेता आपल्या समर्थ अभिनयाचा एक वैशिष्टचपूर्ण असा ठसा मराठी मनावर निर्माण करून राहिला आहे. पण चित्रकार मांडरे हे या अभिनेत्याचे दुसरे व्यक्तिमत्व तितकेच जोमदार आहे, सुंदर आहे हे अलीकडच्या निसर्गचित्रांच्या त्यांच्या मुंबईला भरलेल्या प्रदर्शनाने सिद्ध केले आहे. वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या काही निसर्गचित्रांच्या छायाचित्रांमुळे पुण्यात बालगंधर्व-रंगमंदिरात प्रदर्शित होणाऱ्या त्यांच्या प्रदर्शनाबद्दलच्या अपेक्षा उंचावल्या होत्या.

संगीतक्षेत्रात जशी अनेक प्रमुख घराणी आहेत तशीच चित्रकलेच्या क्षेत्रातही आहेत. आणि कोल्हापूर घराणे हे एक त्यातले वैशिष्टचपूर्ण ठरावे असे घराणे आहे. जलरंगांतील निसर्गचित्रे, स्केचिंग व व्यक्तिचित्रे ही या घराण्याची विशेष अंगे आहेत. या घराण्याचे उस्ताद चित्रकार आबालाल रेहमान, कलामहर्षी बाबूराव पेंटर, बाबा गजबर हे या घराण्यातील ज्येष्ठ मानकरी. यांच्या सहवासाचा

व मार्गदर्शनाचा वारसा घेऊनच चंद्रकांत यांनी आपली वाटचाल एखाद्या वारकऱ्याच्या तळमळीने सुरू केली; आणि चित्रपटांतील त्यांच्या कामाचा मोठा व्याप सांभाळून ही चित्रकलेची वाटचालही निष्ठेने चालवली.

चंद्रकांत मांडऱ्यांच्या या कलाप्रदर्शनातील कलाकृतींचा आस्वाद घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे या कलावंताचा कलाविषयाशी असलेला सच्चेपणा. त्यात स्टाइल, टेक्निक् यांच्या आहारी जाऊन आणलेला कृत्रिम ढंग दिसणार नाही. समोरचे दृष्य जास्तीत जास्त वास्तवतेने कागदावर रंगवणे, त्यातले सौंदर्य अधिकाधिक कलात्मकतेने मांडणे हा एक निदिध्यास यांच्या चित्रात जाणवतो.

मांडऱ्यांच्या कलाजीवनाच्या वाटचालीत त्यांना चित्रकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही. परंतु त्यांच्या एक एक कलाकृती पहाताना त्यांचा आत्मविश्वास प्रत्येक कुंचल्याच्या फटकाऱ्यात प्रगट झालेला दिसतो. या दृष्टीने पहाताना त्यांचे Rain Vally हे चित्र पहावे. यामध्ये टेकड्यांचे आकार, झाडेझुडपे, आकाशातील ढग व दरीतून वर येणारे धुके हे अत्यंत वेधकपणे चितारले आहे.

'अंबरखाना' या चित्रात इमारतीचे रेखाटन करताना त्यातील डौल व Perspective ची जाणीव चांगली दिसते.


आकाशातील ढगांच्या विविध रचना साकार करताना चंद्रकांत आपला कुंचला सफाईदारपणे चालवतात असे दिसते. विशेष म्हणजे या चित्रणातही रंगसंगतीची विविधता, तंत्राचा बदल करून निर्माण केलेला भास आकर्षक आहेच; पण काही वेगळे प्रयोग करण्याची त्यांची धडपड त्यात दिसून येते.

या विविध कलाकृती वेगवेगळ्या वेळी, निरनिराळ्या वातावरणात रंगवलेल्या आहेत. आणि हे वातावरण निर्माण करण्याचे अवघड काम चंद्रकांत यांनी प्रभावीपणाने दर्शविले आहे. गुऱ्हाळाच्या चित्रातील वातावरण तर अत्यंत वेधक झाले आहे. ही कलाकृती अविस्मरणीय झाली आहे.

माहीमच्या खाडीचे चंद्रकांतानी रंगवलेले चित्र तर पुन्हा पुन्हा पहावे असे आहे. या चित्रातील ओलसर दमट वातावरण फारच मनोज्ञ दिसते.

'मिस्टी व्हॅली' ह्या चित्रातील धुके पहात असताना चित्रकार त्या दृष्याशी किती तद्रूप झाला आहे हे लक्षात येते. अशी उदाहरणे आणखीही देता येतील.

जलरंगाच्या माध्यमाचा वापर करताना चित्राचा ताजेपणा व्यवस्थित राखणे ही एक फार अवघड बाब आहे. थोडीही गफलत झाल्यास चित्रे गढूळ दिसण्याची भीती असते. पण या कलाकृती पहात असताना हा ताजेपणा चित्रकाराने फार सामर्थ्याने जोपासला आहे हे स्पष्ट होते. पांढऱ्या रंगाचा वापर कुठेही केलेला दिसला नाही.



प्रदर्शनातील एक निसर्ग चित्र

जसे दिसते तसे रंगवणे हा प्रकार आजकाल जुना ठरू पहात आहे. वास्तववादी चित्रण आता निसर्गचित्रातही लुप्त होऊ लागले आहे. नव्या विचारांच्या लाटे-मध्ये सामान्य रसिकांना मिळणारा निसर्गचित्रांचा निर्भेळ आनंद वाहून जात असलेला अलीकडे दिसतो. पण चंद्रकांत या विचारांच्या आहारी न जाताना आपला मार्ग इमानदारपणाने चालत आहेत. वर्षांनुवर्षांचा त्यांचा व्यासंग, त्यांची जिद्द व चित्रविषयात तद्रूप पावण्याचा त्यांचा गुण पाहून त्यांच्या चित्रकलेच्या घराण्याची ध्वजा ते अशीच फडकावत ठेवतील अशी खात्री वाटते.

प्रदर्शन पहाताना राहून राहून आश्चर्य वाटते ते या गोष्टीचे की चित्रपटांतील आपल्या प्रत्येक भूमिकेत स्वतःचे सर्वस्व ओतून ती भूमिका जिवंत करणारा कलावंत चित्रकलेचा हा व्याप इतक्या नेटकेपणाने करतो तरी कसा ? या क्षेत्रातही त्यांनी जे भरघोस यश मिळविले आहे ते त्यांच्यात उपजतच असलेल्या निसर्ग-सौंदर्याच्या वेडांतच असावे.

प्रदर्शन पाहून बाहेर पडताना वाटते अशी प्रदर्शने पहाण्याची संधी वारंवार येत रहावी.

◻ ◻ ◻

# पुणे तेपूर्णिया

[ पृष्ठ २१ वरून ]

हजार एकर जमीन मिळू शकेल, अशी कामेसुद्धा जमीनदारांच्या हितसंबंधापायी सरळ सरळ डावलली जात होती. त्या भागात नक्षत्रबाबूला १४४ कलम लावलें होते.

इतर पक्षांच्याविषयी मी त्यांना त्यांच्या प्रतिक्रिया विचारल्या.

" संसोपाचे काम कसे काय आहे इथं ?"

" या बिहारच्या लीडर लोकांना हा प्रश्न तितकासा महत्त्वाचा वाटत नाही त्यांचे लक्ष सरकार बनवण्यामागे. रामानंद तिवारी (ससोपा, तेव्हा गृहमंत्री होते.) आणखी एक जनसंघाचा मंत्री यांनी मला फसवून दुसऱ्या जिल्ह्यात नेऊन अटक केली होती. आता जोशीजी आहेत तुमचे; त्यांना खूप करावेसे वाटते. इथल्या कार्यकर्त्यांची सुद्धा निकड असते, पण पार्टीचे निर्णय पक्के नसतात. शेवटी काही होत नाही. "

" जनसंघाविषयी ?"

" त्यांचे काही नाही. पूर्णिया शहरात दोनचार वकील जनसंघाचे आहेत तेवढेच. निवडणुकीत त्यांनी बटाईदारांच्या विरुद्ध भूमिका घेतली होती. "

" नजिकच्या काळात काही होईल असे वाटतं का, की लोक जन्मभर, पिढयान्‌पिढया हे सोसत बसणार आहेत ?"

" नाही. एक दिवस लोक असं काहीतरी करणार आहेत की, ज्यात आम्हीसुद्धा त्यांच्यामागे फरफटत जाणार आहोत. "

" सशस्त्र मार्गावर तुमचा विश्वास आहे का ? असल्यास त्याकरता काही संघटन उभे केले आहे का ?"

" माझा जुलूम दूर करण्यावर विश्वास आहे. पण आता मी अहिंसक मार्गानेच काम करीत आहे. लोकांचा असंतोष संघटित केला तरी भागू शकेल. पण प्रतिकाराची तयारी मात्र दाखवली पाहिजे. जेथे जमीनदारांची ताकद अमर्याद आहे व लॉ अँड ऑर्डरवाले पोलिस त्यांच्या बाजूचे आहेत तिथे लोकांनी स्वस्थ बसणे म्हणजे आत्महत्या आहे. लुटायला आले तर त्यांना हाकलून लावलेच पाहिजे. पण नक्षलवाद्यांसारखे जमीनदारांवर हल्ले करण्याची जरूर नाही. "

बराच वेळ झाला होता. त्यांना पुण्याला यायचे निमंत्रण दिले. ते म्हणाले, " मी कसचा येतो ? माझ्यासाठी एक दिवसाचीदेखील फुरसत मिळत नाही. मला लो ब्लड प्रेशर आहे. डॉक्टरांनी अगदी पडून रहायला सांगितलं आहे. एकदा तिकिट काढलं होतं ट्रेनचं, जियून कुणी परत येत नाही. " असं म्हणून हसले.

मला पोहोचवायला लांबपर्यंत आले. ते म्हणाले, " मी सहसा एकटा फिरत

नाही. जमीनदारांची माणसे कायम पाळतीवर असतात. जोशीजींना उद्या काय प्रोग्रॅम आहे?"

"महेसपूर–सालेपूर."

"मग तेथला जाको आणि रोको बघायला मिळेल. बहोत्त जुलमी है।"

"देखेंगे जरूर."

□

# पाच

ट्रेन चालली होती. सकाळच्या उन्हात पूर्णिया जंगल चमकत होते. मधून मधून छोटी छोटी तळी दिसत होती. त्यात सुरेख गुलाबी रंगाची कमळे दिसत होती. इतकी सुरेख कमळे अद्याप पाहिली नव्हती. कुरसेला आले.

आम्ही परत कुरसेल्याला आलो होतो. तेथून दुसऱ्या मार्गाने आमचा दौरा होता. स्टेशनपासून डाकबंगला दूर होता. पायीच चालायला सुरुवात केली. रस्त्यात बऱ्याच आदिवासी छोट्या मुली जमून गाणी म्हणत चालल्या होत्या. एसेमचे कुतूहल जागे झाले. त्यांनी एका घोळक्याला थांबवून विचारायला सुरवात केली. त्या मुली काही बोलेचनात. त्यांच्या हातात लांब सडक गवत होते. एका मुलीने त्याची सुरेख छत्री बनवली होती. दुसरीने त्याची नाव बनवली होती. तिसरीने धनुष्यबाण बनवला होता.

रस्त्याने चाललेल्या एका माणसाला गाठून विचारले. त्याने सांगितले, आज करम धरम नावाचा त्यौहार आहे. रात्री एका ठिकाणी ही मुलीमुलं जमतात, बहिण भावाला पाण्यातून नाव पाठवते. भाऊ बहिणीला छत्री देतो. बहिण भावाला तिचं रक्षण करण्यासाठी बाण देते. वृद्ध माणूस कहाणी सांगतो.

ती मुले पाहताना वाटले की आपण कुठल्यातरी दुसऱ्या देशाची मुले पहात आहोत. संपूर्ण उघडी. फक्त कंबरेला काहीतरी लटकावलेले. अर्धपोटी. बहुतेकांना मुडदूस दिसत होता. प्रोटीनच्या कमतरतेमुळे भुरकट व विरळ झालेले केस, फासळ्यांचा पिंजरा, त्यातून खाली लोंबणारा पोटाचा डेरा, हातापायाची हाडे दोन्ही टोकांनी फुगलेली. अशी तुकतुकीत ब्राँझची शिल्पे बघून मनाला पीळ पडत होता. एसेम त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न करीत; पण बुजून कोणी बोलत नसे. त्याच रस्त्यावर पलीकडे रघुवंशबाबूची नई हवेली होती. या हवेलीतली माणसे, मुले आणि ही भुतावळ यात नावालाही साम्य वाटत नव्हते. ती दोन वेगळी जगे होती.

डाकबंगल्यात आंघोळ केली. तेवढ्यात एक जीप येऊन थडकली. तिच्यावर संसोपाचा झेंडा फडकत होता. आतून दोन तीन माणसे उतरली. खादीचा पेहेराव. नेतेमंडळी असावीत.

एक होते ऋषिकांत झा, दुसरे मिश्र. आल्यावर आम्ही अमुक ठिकाणी अडकल्यामुळे कसा घोटाळा झाला वगैरे बोलून झाले. सुरेश विद्रोही नावाचा एक स्थानिक कार्यकर्ताही आला. गाडीत बसून पुढचा प्रवास सुरू झाला.

जाताना नबाबगंज गेले. येथे कम्युनिस्ट आणि संसोपाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीरांची लढाई झाली होती. झेंड्यावरून भांडण निघाले होते. शेवटी कम्युनिस्ट पळून गेले होते. त्या मारामारीपायी बरेच जण जेलमध्ये गेले होते.

भंगहा नावाचे गांव आले. एकदम बँड वाजू लागला. मी आश्चर्याने बाहेर पाहिले. हातात झेंडे घेऊन बरेच लोक स्वागतासाठी उभे होते. बँडने कहर केला होता. गाणे लावले होते.

'आज कल तेरे मेरे प्यार के चर्चे है हर जबानपर'

मला हसायला आले.

एसेमच्या गळ्यात हार पडत होते. हार रानटी फुलांचे, अगदी पातळ, पाच सात पिवळ्या लाल फुलांचे. पण आग्रहाने घातले जात होते. माझ्याही गळ्यापर्यंत एक हार आला. मी एसेमकडे बोट दाखवले.

मिरवणुक निघाली. सगळ्या गावात गवताच्या झोपड्या होत्या. पांढरी विरलेली, मळलेली पातळे गुंडाळलेल्या स्त्रिया झोपडीच्या आडोशाच्या आड उभ्या राहून तोंडावर हाताने पदर धरून, मान उंचावून उंचावून बघत होत्या. माझ्या पुढून उघडी माणसे चालत होती. त्यांच्या उघड्या पाठीवर निरनिराळे कातडीचे रोग दिसत होते. गळयाच्या ग्लँडस् वाढलेली माणसेही बरीच दिसत होती.

एका मठात सभा सुरू झाली. आवार गच्च भरले होते. एसेमचे भाषण सुरू


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)

झाले. माणसे लक्षपूर्वक कान लावून ऐकत होती. डोळयांनी बघून घेत होती. भाषण संपता संपता एसेमनी सभेत विचारले, "या सभेत बटाईदार किती आहेत ?", तेव्हा हात वर आलेच नाहीत. एकाने उठून एसेमच्या कानात सांगितले की, जवळ जवळ सगळेच बटाईदार आहेत; पण हात वर केले तर जमीनदाराकडे नावे जातील."

भंगहा सोडले. सालेपूर आले. तेथे असेच स्वागत. फरक एवढाच की बँडऐवजी रेकार्डस् लावल्या होत्या. रेकॉर्डवर गाणे होते 'तुम हसती हो तुम भोली हो.'

याच गावात पलीकडे जाको आणि राको या बंधूंचा मोठा वाडा मागे दिसत होता. तटबंदीसारखी भिंत दिसत होती. इथला प्रमुख कार्यकर्ताही मुसलमान होता. जवळ जवळ निम्मे पाऊण गाव मुसलमानच होते. सभा संपल्यावर त्या कार्यकर्त्याने एका बाईला एसेमकडे आणले.

तिचे नाव सकुंतलादेवी. अंगावर चिरगुटें. तिचा नवरा पाच सहा वर्षांपूर्वी मेला. त्याचा जमिनीवर सिकमी हक्क होता. नवरा मेल्यावर तिने तिच्या लहान मुलासह जमीन कसण्याची तयारी केली. पण जमीनदाराने हुसकावून लावले. आता ती बाई कोठे जाणार ? भीक मागण्याशिवाय इलाज नाही. वास्तविक तिचा सिकमी हक्क असताना तिला बेदखल करणे बेकायदेशीर आहे. पण ती कुठे आता कोर्टात जाणार ? वकीलाला कुठचे पैसे देणार ? तिचा अर्ज एसेमनी घेतला.

एक मुसलमान जमीनदार एका हिंदु स्त्रीला बेदखल करतो, आणि ही शिकायत तेथला मुसलमान कार्यकर्ता आणतो हे चित्र वेगळे व उत्साहजक होते.

जाको आणि राकोबद्दल मी माहिती गोळा करू लागलो. हे फार जुलमी म्हणून प्रसिद्ध आहेत. गावातल्या शेतकऱ्यांचे बैल पळवून आणून कापून खाणे ही यांची नित्याची सवय. सर्वांना माहीत असते बैल कुठे गेला; पण हिंमत नसते काही बोलायची किंवा करायची.

जाको आणि राको हे फार मोठ्या प्रमाणावर कुळांना बेदखल करायचे आणि त्यांच्यावर टायटल सूट कोर्टात लावायची, की कूळ नरम आलेच पाहिजे. याशिवाय जाको आणि राकोची काटा काढायची एक खास पद्धत आहे. त्याला खुपत असलेल्या माणसाला कोठीवर बोलावणे पाठवायचे. जमीनदाराच्या घरचे बोलावणे ! न जावे तर मरणच. जमीनदाराच्या कोठीत हा गेला की तिथे पोलिसाला बोलावून आणून त्याच्यावर डकैतीचा आळ ठेवून अडकवतात. पोलिस त्यांचेच असल्यामुळे पुरावा बिनबोभाट निर्माण करून ५।६ वर्षे खडी फोडायला पाठवतात. तशा एक दोन केसेस नुकत्याच होऊन गेल्या असे तेथे समजले.

जाको, राको जीपमधून बंदूक घेऊनच फिरतात. त्यांनी गावातल्या दोन हिंदू स्त्रियांना जबरीने कोठीवर ठेऊन घेतले आहे.

आजची सभा अत्यंत दहशतीच्या वातावरणात पार पडली होती. जेवण्याचा आग्रह नाकारून जीप सुरू झाली.

पुढच्या गावात जेवण्यासाठी थांबायचे होते. या सर्व भागात तागाचे खूप पीक आहे. वाळवायला पसरलेल्या तागावरून आम्ही चालत होतो. एका बऱ्यापैकी घरा- पाशी थांबलो. दोन खाटांवर गाद्या टाकल्या होत्या. त्यावर स्थानापन्न झालो. लगेच एसेमसमोर केसेस येऊ लागल्या. चार-पाच चांभार व हरिजन आले होते. त्यांना हरिजन-भूमिहीन म्हणून सरकारने काही जमीन दिली होती. पण जमीनदाराने त्यांना हुसकावले होते. सरकार व जमीनदार यांच्यात खटला चालू होता. आता तो मिटेल तेव्हा यांना जमीन मिळणार. तोपर्यंत कसे जगायचे हा प्रश्न होता. पाच काय, दहा वर्षेसुद्धा थांबावे लागेल. दुसऱ्या काही पाण्याखाली गेलेल्या जमीनींचे प्रश्न होते.

पलीकडे पाणवठा होता. त्यात तागाच्या लांब लांब काठ्या भिजत घातल्या होत्या. त्या पुरेशा कुजल्या की ठेचल्या जात व त्याचा चोथा बनवला जाई. अशा चोथ्यामध्ये फक्त धागेच राहतात. अंबाडीसारखे हे ओले मोठ मोठे गठ्ठे डोक्या- वरून निथळत घेऊन बायका जात होत्या. अंगावर अगोदर अपुरे वस्त्र आणि त्यात पूर्णपणे पाण्याने ओथंबलेल्या. त्यामुळे काही लाज राखायची उरलेलीच नव्हती. परिस्थितीची असहायता एवढी होती की ती केविलवाणी नग्नता अंगावर फक्त शहारेच आणीत होती

जेवण झाले. येथले जेवण म्हणजे एका थाळीत दाबून बसविलेला थाळीभर भाताचा ढीग (हा आपल्याला चार दिवस पुरेल) त्याच्यावर एका कडेने दोन कोरड्या भाज्या. एका वाडग्यात डाळ (आमटी). भाज्या म्हणजे परवर-ही एक तोंडल्यासारखी भाजी असते. फक्त बिया खूप मोठ्या असतात. ही भाजी बिहार- मध्ये सर्वांत प्रिय. आणि दुसरी बटाटा. जेवणानंतर उत्कृष्ट दही खायला मिळा- ल्यावर तब्येत एकदम खूष झाली.



या गावचा जमीनदार म्हणजे विश्वनाथबाबू ह्या त्यातल्यात्यात चांगला. गंगेच्या बाढमध्ये ज्यांची पिके गेली त्यांना याने याच्यापासून पेरण्यासाठी जे धान्य उसने नेले होते ते सर्व माफ केले होते. जाता जाता त्यांचे घर लागले. विश्वनाथबाबूंनी आम्हा सर्वांना आत बोलावून पान दिले. त्यांनी एसेमना " इंदिराने केले हे ठीक केले का? मुरारजीला फसवून तिने अधर्म केला नाही का ?" असे विचारले. एसेमनी त्यांच्या धार्मिक बुद्धीला पटेल असे उत्तर दिले.

वरती गच्चीमध्ये एक तरुण मुलगी केस वाळवीत उभी होती. गोरीपान, अत्यंत रेखीव चेहेरा, नाजुकपणा आणि इतर सर्व जगाचा विसर पाडणारी तल्लीनता—हे दृश्य पाहून थबकलो. पाच सातशे वस्तीच्या आदिवासी खेड्यात इतकी कल्चर्ड ब्युटी बघायला मिळेल हे ड्रॅमॅटिकच होते. माझे वर लक्ष गेले हे तिच्या लक्षात येताच ती एकदम दिसेनाशी झाली.

मी पुढे निघालो. आसपासहून निथळश्या 'ताग–सुंदरी' जातच होत्या.

हातातल्या हँडबिलमध्ये बघत होतो. लिहिले होते,

'शामको छह बजे परोरामे आमसभा.'

ह्या आमसभेची उत्सुकता वाटली. दोन तास प्रवासानंतर संध्याकाळी पाचला परोरा आले.

उंच बांबूवर फडकणारा झेंडा लांबूनच दिसला. तासभर विश्रांती घ्यायची होती. एसेमना सक्तीने झोपायला लावले. इतरांना भेटायची बंदी केली.

तिकडच्या सभा म्हणजे मजेदार असतात. सभा सुरू व्हायच्या आधी दोन दोन तास सटर फटर माणसांची भाषणे चालू होतात. लोक जमा होतात. ही भाषणेही फार मजेदार असतात. हसता हसता दमून जात होतो. ते सगळे इथे सांगता यायचे नाही. माणूसच्या कागदांची मला काळजी आहे. आपल्याकडच्या सभा म्हणजे २ तास, जास्तीत जास्त ३ तास. तिकडे ६।६ तास सभा झाल्याशिवाय लोकांना सभा झाल्यासारखी वाटतच नाही. आणि लोकांनाही सभेत भाषण ठोकण्याची अतोनात हौस. अगदी उशीर होत असला तरी मधे मधे लोक घुसून भाषणे करून घेत.

भाषणात आवेश ओतप्रोत असे. आणि फक्त आवेशच असे. ते सरकारला कडक इशारे देत. कडक आंदोलन पेटवण्याच्या धमक्या देत. आणि भाषण संपल्यावर तंबाकू चोळीत पान लावीत निघून जात. आंदोलन राहूद्या, सभेलासुद्धा शेवटपर्यंत बसायची इच्छा नसे.

सगळ्या सभात सुरुवातीला अगदी ठरलेली वाक्ये असत. " आदरणीय जोशीजी और अन्य उपस्थित भाईयों, किसभी सभाके काम ठीक चलनेको सभापतीजी की आवश्यकता होती है। मैं ××× इनके नामका सुझाव रखता हूँ।" लगेच दुसरा उठून माईकमध्ये तोंड घालून,

" मैं उसका समर्थन करता हूँ।"

हे अगदी ठरलेले असे–!

भाषणामध्ये पुनरावृत्ती इतकी असे की कंटाळा येई. उदाहरणार्थ–

" हम बोलते है अंग्रेजी हटाव–हिंदी लाव, मराठी लाव, बंगाला लाव, तमीळ लाव, पंजाबी लाव, असामी लाव, भोजपुरी लाव, मैथिली लाव..." अशी जेवढ्या भाषांची नावे माहीत असतील तेवढी नावे घेत.

त्याच्या पुढचे वाक्य बघा–

"ये लोग बोलते है अंग्रेजी भासामें बहुत शब्द है। अरे क्या हमारे हिंदीम शब्द नही है ? मराठीमें शब्द नही है ? बंगालामें शब्द नही है ? असामीमें शब्द नही है...ही पुन्हा वीस भाषांची नामावळी ! माझा अगदी कधी कधी ब्रेनवॉश व्हायची पाळी येई; पण भाषणे थांबत नसत आणि लोकानाही त्याचा कंटाळा येत नसे.

या सभेचे अध्यक्ष होते संसोपा आमदार कालिकाप्रसाद सिंह. बेचाळीसच्या चळवळीतून पुढे आलेले. यांनी नक्षत्रबाबूंबरोबर रिव्हॉल्वरचा कारखाना काढला होता, पण गांधींनी तुरुंगातून सुटल्यावर शस्त्रे सरकारच्या हवाली करा असा आदेश दिल्यावर यांनी तसे केले. नक्षत्रबाबूने तसे केले नाही.




एसेमच्या भाषणानंतर कालिकाबाबूंचे भाषण झाले. फार चांगले बोलले. त्यांनी सरकारला आवाहन केले की, गरिबांवर भरलेले खटले काढून घ्या. सर्व्हे झाला आहे तिथे त्यांची नावे चढवा, आम्ही नजिकचे आंदोलन पुढे ढकलू. त्यांच्या भाषणात लोकाना जागृत करण्याचे सामर्थ्य वाटले. त्यांची शैली अशी होती– लोकहो, तुम्ही आंदोलनात उतरला नाहीत तर जमीनदार तुम्हाला बेदखल करील. बेदखल झाल्यावर तुम्ही मजुरी शोधाल. पण मजूर इतके झालेत की तुम्हाला मजुरी मिळणार नाही. मग तुम्ही भीक मागायला जाल. पण सगळे लोक गरीब झाले आहेत. तुम्हाला भीक घालायला कोणाकडे काय आहे ? त्यात

पुन्हा तुमच्यासारखी माणसे भिकेकडे वळली म्हणजे भिकारी खूप होतील. त्यामुळे भीक घालणारा कोणा कोणाला घालणार ? मग तुम्ही हात पसरून भटकत बसाल. पण पोटात अन्न नाहीं, वरून उन्हाचा तडाखा म्हणून ताकदही उरणार नाही. ताकद उरली नाही तर पाऊलही पुढे पडायचे नाही. भीक मागायला आवाजसुद्धा उमटणार नाही. मग एका जागी पडून रहाल. कोणी तुमच्याकडे बघणार नाही. तुम्हाला निरनिराळे रोग व्हायला लागतील. मग एकादे दिवशी तुम्ही मराल..."

असे म्हणून कालिकाबाबू आवाज चढवून विचारीत,

"बोला तुम्हाला असे रस्त्याच्या कडेला मरायचे आहे ना ? मग संघर्ष करून का नाही मरत ? आम्ही आमची जमीन सोडणार नाही, तुम्ही मारून टाकले तरी चालेल पण आम्ही ताबा सोडणार नाही असे का नाही ठणकावून सांगत ?"

आज बावीस सप्टेंबर तारीख होती. माजगावकरांना कबूल केले होते की पंचवीसपर्यंत पहिला लेखांक पाठवतो, म्हणून आजपासूनच लिहायला घ्यायला पाहिजे याची आठवण झाली. ही सभा चालू असतानाच मी लेख लिहायला म्हणून सुरुवात केली होती. सर्व लोकांना वाटे मी वार्ताहर असून सभेची भाषणे लिहून घेत आहे म्हणून सगळेजण जवळ येऊन पहात. मराठी शब्द त्यांना समजत नसत. एकेक शब्द वचाता येई.

रात्रीचे जेवण एका छोटया शतकऱ्याकडे होते. त्याची ४।५ एकर जमीन होती. घर स्वच्छ होते. तागाच्या काठयांनी बनवून त्यावर जाड मातीच्या थराने सारवले होते त्यामुळे वाटताना ते मातीचे घर वाटे; पण हाताने वाजवले की लक्षात येई. खिडक्या कलात्मक केल्या होत्या.

एसेम रात्रीचे जेवत नसत. पण आग्रह फार होई. त्यादिवशी तर पदार्थांनी फारच गर्दी केली होती. टोस्ट भाजून आणले होते. खव्याची बासुंदी होती, केळी होती, दही, भात, डाळ भाज्या...एसेमनी अगदी थोडे थोडे म्हणता बरेच खाल्ले.

जेवणानंतर खाटा टाकून सगळे बसले होते. मी बत्तीच्या अर्धवट प्रकाशात लेख लिहीत होतो. एसेम पहुडले होते. चांदणे टिप्पूर पडले होते. मी वासुदेव सिंगला म्हटले, "चला, जरा फिरून येऊ आपण"

सुखद गारवा, गडद धुके, बाजूला झाडी, थंड चांदणे आणि चमचमणारे काजवे. वासुदेव सिंगच्या जीवनात शिरायचा प्रयत्न केला. त्याला एलच मुलगा. बी. एस्सी. झाला. त्याचे लग्न झाले. मुलगी झाली. आणि गेल्यावर्षी त्याने अचानक डायझोन पिऊन आत्महत्या केली. कारण काहीच कळले नाही. तो असे करील असे कोणाला वाटलेही नव्हते.

त्याची छाया वासुदेव सिंगवर कायम आहे. ते जाणवते. त्याला सुनेची काळजी वाटते. काही शिकलेली नाही. वय लहान आहे–चवदा पंधरा वर्षांचे...

मी विचारले, " इतक्या लहान वयात तू मुलाचे लग्न कसे लावले ? त्याने विरोध केला नाही का ?"

" त्याच्या मनात अजिबात लग्न करायचे नव्हते. त्याचं लग्न जबरदस्तीनेच झाले."

" म्हणजे तुम्ही लोकांनी जबरदस्ती केली ?"

" नाही. तुम्हाला इकडचे प्रघात माहीत नाही असे दिसते. तो बी. एस्सीला असताना त्याच्यावर लक्ष ठेवले गेले आणि एक दिवशी त्याला पळविले गेले."

" काय, चक्क पळवून नेले ?"

" हो, आणि कोंडून ठेवले. काही दिवसांनी जबरदस्तीने शादी लावून टाकली. मी माझ्या मित्राच्या मोटार सायकलवरून त्याची शोधाशोध करीत होतो. त्याचे लग्न उरकून येणारे वऱ्हाडी भेटले तेव्हा आम्हाला पत्ता लागला."

" मग, तुम्ही त्याच्यावर खटला वगैरे भरला नाही ?"

" नाही. काय भरून उपयोग ?" सुस्कारा टाकून तो म्हणाला, " एकदा लग्न झाल्यानंतर काय करायचे ? पुन्हा मुलगीही चांगली वाटली."

" असं सर्रास चालतं ?"

" हो, भरतात कोणी कोणी खटले पण एवढं नाही."

" मुलीचे बाप असे का करतात ?"


पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंच
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत । साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

" मजबूर असतात."

मला आपल्याकडले मजबूर वधुपिते आठवले. वासुदेवसिंगाविषयी माझे कुतूहल वाढले.

मुलाचे जबरदस्तीने लग्न लावणाऱ्या माणसाची तो मजबूरी समजू शकतो आणि त्याला क्षमा करू शकतो. काय माणूस आहे हा!

मुलाची केवढी शोकांतिका आहे!

लेखकमंडळी अशा गोष्टींवर गोष्टी का लिहीत नाहीत?

आमची फेरी परत आली तेव्हा घराच्या आवारात बरीच मंडळी जमली होती. एसेमच्या सांगण्याप्रमाणे पंचायत तयार होत होती. या पंचायतीमध्ये सर्व पक्षाचे लोक येतील. त्यांचे काम – कोठल्या जमीनीवर कोण काम करीत आहे याची नोंद करणे, गावात अन्यायाच्या प्रतिकारासाठी सघटित स्वयंसेवक पथक उभारणे, जे धान्य लुटून नेणाऱ्या जमीदाराच्या गुंडांचा प्रतिकार करेल. इ.

आमच्या जीपने हॉर्न वाजवला.

गाडी रात्री १२ ला पूर्णिया शहरात शिरत होती.

वाटेत एक देऊळ होते. गर्दी जमली होती. पेटी वाजत होती. झांजा वाजत होत्या.

एक माणूस पीतांबर नेसून बायकांसारखे नाचत होता.

मला आश्चर्य वाटले. मी विचारले, " कोण आहेत हे ?"

कालिकाप्रसाद म्हणाले, " पूर्णियाचे आमदार आहेत !"

" काय आमदार ? आणि असे नाचत का आहेत ते ?"

" सखी समाजाचे आहेत ते !"

" ही काय भानगड आहे ?"

" सांगतो."

□

(क्रमशः)

---

'पुणे ते पूर्णिया' या लेखमालेचे अखेरचे दोन भाग यापुढील दिवाळी अंकात प्रसिद्ध होत आहेत. – संपादक

---

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन

पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

## बिर्ला अफेअर्स

गांधीजींचा खून बिर्ला हाऊसमध्ये १९४८ साली झाला. याच घरात आज लाखो लोकांचे सुख, आरोग्य व संपत्ती यांचा राजरोस खून पाडण्यात येत आहे ...

हे खून कसे पचवले जातात ?

केशवराम कॉटन मिल, ओरिएंट पेपर मिल, हिंद पॉटरिज, ज्यूट इन्व्हेस्टमेंट कंपनी, ॲबॅसेडर गाड्या बनविणारी हिंदुस्थान मोटर्स – इत्यादी कंपन्यांची कृष्णकृत्ये सरकारी कागदपत्रांच्या पुराव्यांनिशी उजेडात आणून लाल धोक्याचा वेळीच इशारा देणारा, मंत्री-मंत्री, दरबारी-कारभारी, सरकारी नोकर, उच्चपदस्थ अधिकारी यांच्या लाग्याबांध्यातून निर्माण झालेल्या बिर्ला साम्राज्यावर प्रहार करणारा, 'दादुमिया' यांचा खास लेख.

– माणूस दिवाळी अंक

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



" राजीनामा कसला मागता ? ह्यांचं चारित्र्य संपूर्ण निष्कलंक आहे. आतापर्यंतच्या सर्व गुन्ह्यांबद्दल त्यांनी पुरेपूर तुरुंगवास भोगला आहे न् पूर्ण दंड भरलेला आहे, सांगून ठेवते ! ..."